# SBI PEN. ASSN.'S SAMVAD

स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल), पुणे यांची गृहपत्रिका

Price Rs. 3/-

स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल) पुणे

।। स्वयमेव मृगेंद्रता ।।

# संवाद

*मनामनांचा मेळ जुळावा । द्वेषाचा लवलेश नसावा ।।*
*सादासी प्रतिसाद मिळावा । वाद नको संवाद असावा ।।*

Vol.-1 Issue - 11 मे २००९ May 2009


## j *संपादकीय*

सप्रेम नमस्कार,

आम्ही संपादक मित्र वारंवार असोसिएशनच्या ऑफिसमध्ये भेटत असतो हे सर्वांना माहीत आहे. मागील आठवड्यात आमचे मित्र चंद्या देशपांडे आणि सुरेश कुलकर्णी (नावे काल्पनिक आहेत) ही जोडगोळी सारसबागेत सकाळी भेटली. काळजीच्या सुरात चंद्याने प्रश्न केला, ''अरे आपल्या पेन्शन वाढीचे काय झालं ?'' मी त्याला 'अजून वेळ लागेल' असे उत्तर दिल्यावर दोघांनी असोसिएशन, राजकारण, न्यायालय ह्यावर टीका करून आपल्या विद्वत्तेचा (?) ठसा उमटविला. जोडगोळीला सहज म्हटले, ''सध्या उद्योग काय?'' ''आता उरलो आरामाकरिता.'' चंद्याने हासत विनोद केला. चंद्याच्या मनातील हा तुकाराम त्याच्याच पंक्तीतील असावा. अशी पेन्शनर मंडळी सगळीकडेच असतात.

''तारुण्यात खूप काम केलं. आता काहीच करायचं नाही असं ठरवलंय. मुलाला भरपूर पगार आहे. स्वत:ची अन् बायकोची पेन्शन आहे. लग्न, मुंजी, बारसे, साठीशांती, तेरावा, चौदावा ह्यात वेळ कसा जातो कळत नाही.'' पेन्शनर कट्ट्यावर ह्या अन् अशाच गप्पा चंद्यासारखे पेन्शनर करत असतात.

ह्याउलट दुसरे सत्य चित्र अनेक ठिकाणी दिसते. आमचे सभासद मित्र श्री.सुरेश डोंगरे विवाह मंडळ चालवितात. आत्तापर्यंत जवळजवळ २००० विवाह त्यांनी जमविले आहेत. ह्याशिवाय दत्तसंप्रदाय अभ्यासानिमित्त त्यांचे सतत भारतभर भ्रमण असते. श्री.मधु पोतदार ह्यांनी सिनेसृष्टीतील मातब्बर मंडळींवर डझनभर पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या काही पुस्तकांना राज्य शासनाचे पुरस्कारही मिळाले आहेत. सर्वश्री दांडेकर, गोखले, लळिंगकर नि अन्य काही मंडळी असोसिएशनच्या कामात सतत व्यग्र असतात. तारुण्यातील चाकोरीच्या गोष्टींपेक्षा साठीनंतरची ही सेकंड इनिंग नक्कीच सर्वांना आव्हानात्मक असते. नोकरीनंतरच हे वेगळे करियर ही सर्व मंडळी बुध्याच करीत आहेत. त्यांच्या मनात असलेले ध्येय त्यांना एक वेगळेच समाधान-आनंद-संतोष देणारे आहे. हा आनंद हीच त्यांची पेन्शन वाढ असते. सभासदांच्या समस्या सोडविण्याचा आनंद काही वेगळाच असतो. आपणच स्वत: निर्माण केलेल्या कामाने संतुष्ट होऊन हे लोक जगत असतात. संतोष, आनंद ही अशा मंडळींची मोठी ताकद असते. ह्या मंडळींना संतोषातूनच कामाची प्रेरणा मिळते. असेच एक सभासद श्री.अनिल खाडिलकर नेत्रदानाचे काम करतात. ह्यांचे शालेय शिक्षण नगरमध्ये झाले. ह्यांनी पुण्यातील नगरवासियांना एकत्र करून त्यांची एक संस्था स्थापन केली आहे. शिक्षण व वैद्यकीय कामासाठी ही संस्था कार्यरत आहे. ह्याशिवाय पुण्यातील अनिवासी भारतीय पालकांच्या संस्थेमध्ये ते काम करतात. अशा सामाजिक कामांमुळे त्यांचा अनेक संस्थांशी संबंध येत असून त्यामुळे नेत्रदान, शिक्षण व वैद्यकीय कार्याला गती मिळत आहे. आनंद, संतोष ह्या चुंबकाने ही माणसे अनेक कामे ओढवून घेतात आणि आनंदाच्या महासागरात डुंबत राहतात. त्यांना माहीत असते की हा आनंदच आपली रोजी-रोटी आहे. ह्यांच्या तब्येती कधीच बिघडत नसतील का ? पण तरीही ते त्याकडे दुर्लक्ष करतात. कारण ही मंडळी कामाने झपाटलेली आहेत. निवृत्तीनंतर फॅमिली पेन्शनरांचे काम करणारे आमचे मित्र आदरणीय श्री.पराडकर ह्यांनी अनेक भगिनींना मदतीचा हात देऊन फॅमिली पेन्शन मिळवून दिलेले आहे. ह्याच आनंदात ह्याच विचारात ही मंडळी जगत आहेत. आज श्री.पराडकरांनी वयाच्या ८६ च्या पुढे मजल मारली असून त्यांच्या उत्तम तब्येतीचे हेच रहस्य आहे.

ही उदाहरणे वानगीदाखल झाली. आमचे असे अनेक सभासद 'छोटे बाबा आमटे'च आहेत. सेवा आणि त्याग ह्या भूमिकेव्र आनंदात, संतोषात राहणारे. पण आपण त्यांच्याकडे डोळसपणे न पाहता 'लष्कराच्या भाकऱ्या भाजणारे' अशी त्यांची उपेक्षा करतो. चंद्या देशपांडे व सुरेश कुलकर्णी या वरील जोडगोळीला व त्यांच्या विचाराच्या व धारणेच्या अनेकांना ह्या सेवाव्रतींच्या कार्यापासून नक्कीच प्रेरणा मिळेल आणि तेही अशा कार्याला नक्कीच वाहून घेतील.

ह्या सेवाव्रतीच्या कार्यकर्तृत्वाला आमचा मनापासून मुजरा आणि त्यांना आमच्या कार्याला शुभेच्छा.

**- शरद शिंगवेकर**

We reproduce hereunder a letter Dt.04-03-2009 addressed by Shri.T.Pandurang Rao, retired Dy.M.D. to the Finance Minister, Govt. of India for information of members

## Memorandum submitted by Shri. T. Pandurang Rao, retired Dy.Managing Director in the service of the State Bank of India to the Union Finance Minister

(Courtesy - 'SBI Pensioners' Mews Bulletin' Issue of March 2009 of SBI Pen.Assn, Hyderabad Circle)

Hon'ble Finance Minister,

The Government of India was turning down almost every demand of the SBI pensioners saying that they are in receipt of three retirement benefits which no other pensioner is getting. While it is true that we were given Provident Fund besides Gratuity, the amounts were really paltry. In my own case, having retired at the highest grade in the service of the Bank in 1992, after about 35 years of service, the gratuity paid was Rs.30,288=30p (check No.433478 dated 11-03-1992) and Bank's contribution to my provident fund A/c was about Rs.2,00,000/-. The total amount of Provident Fund balance paid to me (i.e. aggregate of my own contribution which @ 25% during the last five years of my service and Bank's contribution) by Check No.478788 dated 30-06-1992 was Rs.4,27,141=36p. As such, the Bank's contribution could not have been more than Rs.2,00,000/-. As Dy.M.D. in the Bank, my substantive salary at the time of retirement was Rs.7,555/-. on this basis my basic pension was kept at Rs.2,400/- the ceiling then in force.That amounts to about 31% of the last 12 months average substantive pay. The total pension + D.A. is Rs.11,665/- which is what I get today. All of us in this category are nearly 75 years old and have health related expenses which account for almost 25% of the pension sum of Rs.11,665/-. With this grandiose pension of Rs.11,665/- and interest on Rs.2,30,288=30p given by way of Gratuity plus Provident Fund, life for a senior executive on retirement must keep going !!! In other words, for the sin of having received gratuity of Rs.30,288=30p we are made to forgo basic pension of Rs.1,375/- (i.e. 50% of Rs.7,550/- = Rs.3,775/- <u>less</u> Rs.2400/-) and D.A. thereon amounting to say Rs.4,525/- a total of Rs.5,900/- per month. The amount of pension we are now getting is less than what the junior most officer cadre in the Industry is getting. We are not asking for revision of pension on the basis of the salaries now obtaining in the industry giving parity with those retiring today. All that we are asking for is 100% neutralization in the D.A. and removing the ceiling of Rs.2,400/- on the basic pension and fixing it at 50% of the last 12 months average substantive pay. This may be given to all those who retired prior to 2002. After all, the Bank has no difficulty in accepting this proposal if the GOI does not reject, for the simple reason **that this category will not last long** and the additional burden on the Bank is almost nothing. I request the Finance Minister to consider this plea against the back ground of salary structure obtaining in Banks today.

Yours faithfully,

T. Pandurang Rao

## विनोद - आता बोला...

‘‘पाण्यात राहून माशाशी वैर करू नये हो !’’ फडकेकाकू परब वहिनींना समजावत होत्या.

‘‘वैर कसले ? आम्ही तर माशांना पाण्याबाहेर खेचून छान रस्सा करतो म्हटलं !’’ परब वहिनी ठसक्यात उत्तरल्या.

- **विवेक ठाकुर,** दादर (मुंबई)

## सभासदांना आवाहन

आपल्या पेन्शनर्स बंधु-भगिनींपैकी बऱ्याच सभासदांनी स्वत:ला समाजोपयोगी विविध कार्यात झोकून दिलेले आहे. अशा सभासद मित्रांची व त्यांच्या बहुमोल कार्याची ओळख ‘संवाद’च्या सर्वच वाचकांना होणे आवश्यक आहे असे आम्हास वाटते. अशा सभासदांनी स्वत: किंवा त्यांच्या मित्रांनी त्यांच्या कार्याची थोडक्यात माहिती असोसिएशनच्या झोनल सब सेंटरमार्फत आम्हाला कळवावी. म्हणजे ‘संवाद’च्या माध्यमातून त्याची यथाकाल दखल घेता येईल.

**- सेक्रेटरी**

## State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune

### Panaji Zonal Sub-Centre

### Proceedings of the 11th Annual General Meeting Dt. 12th April 2009

The 11th Annual General Meeting of Panaji Zonal Sub-Centre covering Goa, Sindhudurg & Ratnagiri Districts was held on 12th April 2009 at Staff Learning Centre, Panaji. Around 170 members including Associate Members and Family Pensioners attended the meeting.

The dignitaries who attended the AGM included Shri.M.Y.P.Dessai, AGM (Admin.), Panaji Module, Office-bearers of our Circle Association Sarvashri V.M.Gokhale, R.N.Lalingkar, S.P.Barve, special invitees Sarvashri B.B.Gupte, Chandrakant Kulkarni, S.M.Dharadhar, P.A.Lopes, five members from Sangli unit, Dr.A.A.Bandodkar, Bank's Chief Medical Officer, Shri.Manubhai Gohil, Chief manager (HR & P), Mr.P.S.Karant, AGM Reg.II, Shri.A.S.Shridharan, AGM of Panaji Branch.

1. Shri.P.M.Narkar, President of Panaji ZSC extended a warm welcome to the dignitaries, special invitees and all the members present at the AGM. Shri.M.Y.P.Dessai inaugurated the meeting by lighting the traditional lamp along with other dignitaries.

2. Two minutes silence was observed to condole the death of the following members who passed away during the period since the last AGM. (i) Shri.U.R.Dalvi; (ii) Shri.R.A.Verlekar; (iii) Shri.S.P.Tendulkar; (iv) Smt.Narmada Kamat; (v) Smt.Kamini Marathe and (vi) Shri. L. M. R. Fernandes.

3) Initiating the Bank's Meet with the Pensioners, in his welcome address, Shri.Narkar outlined certain problems faced by the members in respect of medical facilities provided by the Bank. He raised the issue of opening of Bank's Medical Dispensaries at Kanakavali and Mapuca. He said that only one Hospital is approved for pensioners in Goa. At least 2 or 3 more Hospitals should be approved. As regards the replenishment of funds for Medical facilities, he said that this matter is getting proper attention now. There should be a Holiday Home in Goa, specially located at a place like Panaji. Adequate medicines should be ensured in the ZO Dispensary to avoid inconvenience to the pensioners who are coming from far away places and not getting medicines. Temporary arrangements of posting Pharmacist when the permanent one is on leave. Shri.Narkar also advised members to open joint Pension account with the spouse and the account should be made payable to 'Either or Survivor' so as to avoid any inconvenience in case of need.

4. In his speech Shri.Dessai complimented the members for having a best organised body of Bank's Pensioners throughout the country. He said that State Bank is undergoing a tremendous change. A new version of 'Parivartan' is on the way. He encouraged the pensioners to share their valued past experience in the Bank through the columns of "Second Innings", a Bank's quarterly magazine for the pensioners. He proposed to have a Library for the working and retired staff and asked assistance for its success. As regards demands of various Medical facilities such as opening dispensaries at Kanakavali & Mapuca as also supply of medicines, he assured the gathering that he will follow-up the matter. Manipal Hospital at Dona Paula is expected to be enlisted shortly. As regards Holiday Home, he told the gathering that he hopes to have one at the earliest. He requested the members to bring to the notice of ZO any deficiencies/problems and was happy to be a part of the larger family of State Bank.

5. Shri.V.D.Kulkarni, Vice-president of Panaji ZSC, while concluding the "Pensioners' Meet", expressed gratitude and conveyed thanks to Shri.Dessai and other functioneries of the Zonal Office for their presence and gracing the function. Thereafter, the AGM's usual agenda items were taken after Tea break.

6. The minutes of the last AGM were approved by the house unanimously. A Talk on attitudes, origin of illness, disposition, life style and how to take problems in their stride with very good tips on how to keep physically fit was given by Dr.A.A.Bandodkar, Sr.Medical Officer of the Bank. He said that walking is extremely important as also 'Pranayam' and 'Meditation'. While touching the points raised by Shri.Narkar, he said that 3 Hospitals for approval are in the pipeline.

7. The following three senior members who have completed 75 years of age were felicitated at the hands of dignitories from the Circle Association :-

(i) Shri. Hugo Rodrigues Chico
(ii) Shri. S.X.D'souza
(iii) Shri.Atchut V.S.Bandio.

8. The Annual Report of the ZSC was read out by Shri.V.D.Kulkarni, Vice-President. The report contained the achievements of the ZSC during the year. The membership has reached 746 of which 51 were new members. Monthly meetings are being arranged regularly at Panaji, Margao and Mapuca. Nine members participated in 'Dharna' programme organised by our Federation at Azad Maidan, Mumbai on 23rd Sept 2008. Sixteen members voluntarily extended monetory relief by collecting donations which were handed over to the ailing colleague, now late Shri.U.R.Dalvi whose family faced fanancial crisis at the crucial moment. The ZSC is proud to state that its President Shri.P.M.Narkar conducted the elections of our Nagpur ZSC as also of Federation in a systematic and transparent manner which was lauded and appreciated by the Circle authorities.

9. Shri.P.M.Narkar in his presidential address stressed the need of taking care of Mental peace, Medicines and Money after retirement and have a positive approach for every thing. He further said that for solving the problems of the pensioners, they are maintaining good relations with the ZO authorities. He also apprised of the various efforts being made at Federation level in getting the pending issues solved by means of negotiations as also through court cases. He advised the members to open joint pension account with 'E or S' facility.

10. Shri.R.N.Lalingkar, Secretary of the Circle Association, advised the members to make use of 'Internet Banking' facility provided by the Bank. He also cautioned to review the record of their Nomination on all Bank accounts in 'Core Banking System', since it is observed that the instructions recorded earlier at the time of 'Bank Master' have not been carried out when the system migrated to Core Banking. He also requested the members to advise HQs at Pune whenever there is change in address to get the 'SAMVAD' regularly.

11. Shri.V.M.Gokhale, President of the Circle Association, praised Shri.Narkar for his excellent performance while conducting elections of Nagpur ZSC, as also as an Election Officer at the time of Federation's elections held recently at Bangalore. While addressing the gathering Shri.Gokhale told that despite best efforts at Federation level, the problem of 7th Bipartite retirees has still remained unresolved due to adamant attitude of the Govt authorities. The Govt. has so far not acted upon the Judgment order passed by Madras High Court in October 2008. The hearing of the Delhi High Court case has been started and we hope to get the justice at the earliest. He told that our Circle Association has filed a civil writ petition in Nagpur High Court to solve the 'Family Pension' issue as directed by Federation. The case has been admitted by Nagpur High Court.

13. Shri.M.H.Parvatkar was coopted on the Committee of Panaji ZSC and it was accepted by all the members unanimously.

14. In the open forum, Shri.K.P.M.Rajan sought clarification as regards refund of amounts contributed towards Mutual Welfare Scheme after retirement. In reply Shri.Lalingkar explained the procedure laid down in the scheme.

15. The AGM was concluded with the Vote of Thanks proposed by Shri.I.H.Dias, Secretary of Panaji ZSC.

**I.H.Dias**
Secretary

We publish here under a copy of letter dated 31-01-2009 sent by our Federation to Shri.P.K.Bansal, Hon'ble Minister of State for Finance, Government of India requesting him to arrange for the revision of pension on Seventh Birpartite Pay Scales as per Bank's proposal dated 19-04-2006 and implementation of the judgment dated 16-10-2008 of Madras High Court.

***************************

Respected Sir,

**Sub : Grievances of Pensioners and Family Pensioners of State Bank of India**

We wish to bring to your kind attention to our following grievances and request you to take appropriate steps for resolving these grievances as early as possible.

**Pension Scheme in State Bank of India**

The Pension Scheme in the State Bank of India is more that 150 years old. It is supported by adequate Pension Fund contributed and maintained by the State Bank of India. There are about 1,00,000 pensioners and family pensioners. The Pension Scheme is governed by statutory pension rules, in terms of which, a pensioner with a minimum service of 30 years is entitled for pension at 50% of average pay of last twelve month's pay. Initially a ceiling of Rs.1,000/- on this pension was stipulated. This ceiling was increased in February 1989 to Rs.2,400 at 50% of the then maximum salary. On every revision of salary, pension is required to be revised. This ceiling is also required to be increased based on the maximum of the revised salary. For revising the ceiling, amendment to Pension Fund Rules is required to be made. As per statutory provisions, amendment to our Pension Fund Rules can be made after getting the approval from Government on the basis of recommendations made by the State Bank of India in consultation with Reserve Bank of India. After the revision of the ceiling to Rs.2,400/- in February 1989, there were four revisions of salary. The recommendations made by State Bank of India for the revision of our pension on the revised salary made to Government after securing the concurrence of RBI were not approved.

2. In regard to our pending pension issues, the **Revision of Pension to those retired between 1-11-1997 and 31-10-2002 needs to be attended to immediately and urgently, as the retirees of this period are still being paid pension on the pre-revised salary of 1993 scales of pay. The pensioners of the period** between 1-11-1997 and 31-10-2002 are the worst affected. Those retired before this period as also those retired after this period are being paid pension calculated on the basis of actual salary paid to them at the time of their retirement. The proposal submitted by the SBI on 19-04-2006 to the Government, for the revision of pension to the pensioners of this period on the basis of the formula adopted for the post 1-11-2002 retirees and pre 1-11-1997 retirees has not been approved by the Government. In view of this undue delay, some pensioners of this period have filed a writ petition in the Madras High Court in 2002. The Madras High Court has passed its order on 16-10-2008 while pronouncing its judgment in this writ petition, directing the Government to consider and approve this proposal dated 19-04-2006 of SBI within three months. We appeal to the Government that this judgment should be accepted and implemented without delay.

3. We enclose a copy of this judgment along with the copy of the Bank's Proposal dated 19-04-2006 for your information. We seek your help in implementing this judgment of Madras High Court. This will provide relief to more than 30,000 families of the pensioners of State Bank of India.

Thanking you,

Yours sincerely,
Sd/-
(P.P.Sankarnarayana Murthy)
General Secretary

***********************

The copy of the above letter has been forwarded by the Government to our Bank. A copy of our Bank's letter dated 2-04-2009 to our Federation and also a copy of a letter dated 8-04-2009 from our Federation to the Corporate Centre of our Bank are also published on the next page for the information of our members.

(Courtesy - "SBI Elders Voice - April 2009 issue")

( Copy of Bank's letter Dt.02-04-2009 to our Federation)

**SBI Pensioners**

**7th Bipartite Settlement - Hon'ble Madras High Court Judgment**

We refer to your letter dated dated 31-01-2009 addressed to the Minister of State for Finance, Govt. of India, New Delhi, which was forwarded to this office under GOI covering letter No.F/21/1/G/2005-IR dated 16-02-2009. We have noted the contents thereof and advise that the Judgment dated 16-10-2008 at the Hon'ble High Court of Judicature at Madras on Writ Petition No.s 23523/2001, 34761/2002, 45193/2002 and 5848/2003 did not contain any direction to the State Bank of India. We advise accordingly.

For Dy.M.D. & CDO, Corporate Centre

Sd/-

*************************************

( A copy of our Federation Letter No.FED/GS/018/2009 dated 8-04-2009 addressed to Corporate Centre)

**SBI Pensioners**

**7th Bipartite Settlement - Hon'ble Madras High Court Judgment**

We are in receipt of your letter of 2nd April 2009 and noted contents. As the judgment and order dated 16-10-2008 delivered by the Hon'ble Madras High Court has been pronounced on the basis of your proposal dated 19-04-2006 sent to the Government of India on the revision of pension on Seventh Bipartite pay scales, produced by your counsel to the Court, we have made an appeal to the Hon'ble Minister of State for Finance to arrange for the implementation of the above judgment. We, therefore, request you to take up the matter suitably with the Minister concerned to consider our appeal dated 31-01-2009 made to him favourably, in response to the letter No.F/21/1/G/2005-IR dated 16-02-2009 received by you from the Government under advice to us.

Yours sincerely,

Sd/-

(P.P.Sankarnarayana Murthy)

General Secretrary

***********************************************

**Federation's clarification printed in "SBI Elders Voice" - April 2009 issue in respect of Judgment dated 16-10-2008 of Madras High Court**

"We have been receiving anxious enquiries from our members at various centres regarding the implementation of the judgment dated 16-10-2008 delivered by the Madras High Court. We regret to advise that the Government is reported to have decided not to act as per the above Judgment. The Standing Counsel of the Government made a plea on 9-02-2009 requesting the Hon'ble Judge to review the order passed, on the ground that the rejection of our Bank's Proposal dated 19-04-2006 by the Government was not brought to the knowledge of Court, before the judgment was delivered. The Hon'ble Judge rejected this plea. The Government is, therefore, expected to appeal against this judgment. Our Bank has made it clear that it does not have a case to appeal against the above Judgment. With this unfortunate decision, the patent discrimination caused to the Seventh Bipartite retirees continues to persist, forcing us to face the might of the Government in a protracted and vexatious legal battle."

We reproduce a letter No.P-04 dated 30th April 2009 written by Shri.V.M.Gokhale, President of Mumbai Circle Pensioners' Association to the Chairman of State Bank of India regarding Revision of Family Pension. The submissions made in the letter have been endorsed by Shri.B.K.Ghose, President of Federation and have been recommended to the Chairman while forwarding a copy of the letter to him.

*******************************************

The Chairman
State Bank of India,
Corporate Centre,
Mumbai

No.P-04 Date :30-04-2009

Dear Sir,

**Writ Petition No.5904/07 - Family Pension**

Petitioner : SBI Pensioners Association (Mumbai Circle) and 4 others (Family Pensioners)

Vs.

Respondents : 1. Union of India, New Delhi-110001
2. SBI Corporate Centre, Mumbai-400021

*************************************

As suggested by our Advocate Shri.Anand Parchure, we give hereunder some of the points highlighting the shortcomings in revision of Family Pension Scheme and suggesting remedial steps to rectify the injustice done to our Family Pensioner members as a result of your decision to apply the industry level formula to our Family Pensioner members.

At the outset we wish to point out that as per Supreme Court Judgment dated 23-02-1989 and as per Para 4 of Mumbai Circle Circular No.Staff/43 of 1988 dated 5-9-1988 the "Family Pension" is based on the salary scales wherein DA upto 332 points (CPIN - 1960=100) have been merged. We quote the relative sentences from para 4 of the Circular under reference.

**"The aforesaid minimum pension and maximum pension have been laid down with reference to the present scales of pay which are based on merger of DA at 332 points of Consumer Price Index (base 1960)"**

While the Bank appears to have revised the rates of calculating the Family Pension on the basis of Industry level settlement where DA upto 600 points have been merged in the salary, they have not taken due care of the gap of 268 points (600 - 332) while finalizing the revised Family Pension. This has resulted in continuance of anomalies and injustice on the Family Pensioners.

You will observe from the enclosed statement flagged at 'A' (Annexure) that not only there has been no increase in gross Family Pension consequent upon the so called revision in Family Pension, the Family Pensioners continue to lose heavily as compared to the original Family Pension which would have been drawn by them had there been no salary revisions during the last 20 years.

For your information we give example of 3 categories of Family Pensioners from which you will observe that in the revised formula declared by the Bank they have not gained anything but are losing heavily.

( P.T.O.)

As on 31-3-2009

| Category | Gross Family Pension after revision declared on 28-01-2008 | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Salary 332 pts DA Merger | Salary 600 pts DA Merger | Salary 1148 pts DA Merger | Salary 1684 pts DA Merger | Salary 2288 pts DA Merger |
| Subordinate | 3129 | 2537 (-592) | 2531 (-598) | 2538 (-591) | 2729 (-400) |
| Clerical | 4696 | 3382 (-1314) | 3384 (-1312) | 3392 (-1304) | 3695 (-1001) |
| Spl.Gr.II Dy. M.D. | 6454 | 6217 (-237) | 6533 (+79) | 7079 (+625) | 7110 (+656) |

You will observe from the above analysis that the only remedy to dispense justice and give correct fitment to all the Family Pensioners is to give effect to the 268 points DA Merger which has been lost in the process of your fitment of Family Pension on the basis of the **Industry level formula** and pay the arrears to all the Family Pensioners with effect from 1-11-1987. To remove all the anomalies the correct formula would be to calculate family pension at the flat rate of 30% of pensionable pay.

The Bank has not carried out Apex court order dated 23-2-1989 in letter and spirit. In this connection we refer to your Letter No. CDO/PM/16 SPL/29 dt.19-4-2006 addressed to Shri.Vinod Rai, Spl. Secretary, Government of India, Ministry of Finance, New Delhi. In para No.4 of the letter you have yourself stated that the matter of Family Pension has been fully delegated to the Central Board of the Bank; as such the revision is within your powers to make the adjustment.

We also wish to add that as per the original Family Pension Scheme, the quantum of family pension of the **spouse** was never affected due to the stipulated ceiling of Rs.1,000/-. However, in the latest improper revision, the spouses of some of the officials will be deprived of some amount while calculating their Family Pension. The purpose of stipulating the ceiling has been completely forgotten.

(Ref. Mumbai LHO Circular No. STAFF-17 of 30-5-1990, Para 2 (ii)

In view of the above, we request you to accede to our request of "30% of Pensional Pay at flat rate" for calculating Family Pension.

Kindly advise us at an early date.

Yours faithfully,
Sd/-
President
(V.M.Gokhale)

*******************************************************************************

## विनोद

रामभाऊ : हल्ली मला नीट ऐकू येत नाही. मी स्वत: खोकलो तरी मला खोकल्याचा आवाज येत नाही.

डॉक्टर :- दिलेले औषध २ चमचे रोज घ्या.

रामभाऊ :- म्हणजे माझे कानात सुधारणा होईल ?

डॉक्टर :- नाही. कान सुधारणार नाहीत पण खोकला मोठ्याने येईल.

- **पु.नि.देशपांडे,** अमरावती

## घरातील स्थान

'माझे या घरातील नेमके स्थान कोणते याचा मला खुलासा पाहिजे.' विमलाबाई नवऱ्यावर कडाडल्या.

'त्यात खुलासा काय करायचा ? तुझे स्थान या घरात टेलिफोनशेजारी आहे. सतत तू तरी फोन करतेस नाहीतर तुझ्या मैत्रिणी करतात.' वसंतराव म्हणाले.

- **पी.के.देवधर, पुणे**

**ANNEXURE**

## State Bank of India
## Comparative Statement of Gross Family Pension after improper revision of the rates of Family Pension

**As on 31-3-2009**

| Category | Gross Family Pension Salary 332 pts. DA Merger | Gross Family Pension after revision | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Salary 600 pts. DA merger | Difference between col. 2 & 3 (-) or (+) | Salary 1148 pts. DA Merger | Difference between col. 2 & 5 (-) or (+) | Salary 1684 pts. DA Merger | Difference between col. 2 & 7 (-) or (+) | Salary 2288 pts. DA Merger | Difference between col. 2 & 9 (-) or (+) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| Subordinate staff | Min. 3129 | 2537 | - 592 | 2531 | - 598 | 2538 | - 591 | 2729 | - 400 |
| Clerical | 4696 | 3382 | - 1314 | 3384 | - 1312 | 3392 | - 1304 | 3695 | - 1001 |
| JMGS-I | 4696 | 3935 | - 761 | 4061 | - 635 | 4295 | - 401 | 4690 | - 6 |
| MMGS-II | 4735 | 4273 | - 462 | 4394 | - 341 | 4638 | - 97 | 5105 | + 370 |
| MMGS-III | 5231 | 4273 | - 958 | 4503 | - 728 | 4753 | - 478 | 5243 | + 12 |
| SMGS-IV | 5316 | 4527 | - 789 | 4614 | - 702 | 4868 | - 448 | 5381 | + 65 |
| SMGS-V | 5564 | 4989 | - 575 | 5056 | - 508 | 5326 | - 238 | 5934 | + 370 |
| TEGS-VI | 5969 | 5496 | - 473 | 5585 | - 384 | 5833 | - 136 | 6540 | + 571 |
| TEGS-VII | 6184 | 5879 | - 305 | 6180 | - 4 | 6424 | + 240 | 7110 | + 926 |
| Spl.Gr.-I (CGM) | 6285 | 6048 | - 237 | 6356 | + 71 | 6786 | + 501 | 7110 | + 825 |
| Spl.Gr.-II (Dy.M.D.) | 6454 | 6217 | - 237 | 6533 | + 79 | 7079 | + 625 | 7110 | + 656 |

( - ) Reduction ; ( +) Increase

# स्टेट बँक ऑफ इंडिया पेन्शनर्स असोसिएशन (मुंबई सर्कल),पुणे
## पुणे झोनल सब्-सेंटर
## वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

पुणे झोनल सब्-सेंटरची वार्षिक सर्व साधारण सभा बुधवार दि.२२ एप्रिल २००९ रोजी सायं.५ वाजता भरत नाट्य मंदिर, पुणे येथे संपन्न झाली. या सभेस आपल्या फेडरेशनचे माजी अध्यक्ष व सध्याचे सल्लागार श्री.बी.जी.दांडेकर, तसेच सर्कल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.व्ही.एम.गोखले, व्हाईस-प्रेसिडेंटस् श्री.नारकर (पणजी), श्री.एस.बी.गोखले (मुंबई), श्री.एस.जी.देसाई (नागपूर), सेक्रेटरी श्री.लर्लिंगकर तथा सर्कल मॅनेजिंग कमिटीचे अन्य सदस्य व पुणे झोन मधील सुमारे ३०० सभासद उपस्थित होते. श्री.अशोक पंडित, जॉइंट सेक्रेटरी (पुणे) यांनी झोनल प्रेसिडेंट श्री.विजय भावे यांचे हस्ते सर्व मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

झोनल सेक्रेटरी श्री.चंद्रकांत कुलकर्णी यांनी प्रथम गतवर्षामधील दिवंगत सभासदांची नांवे वाचून दाखविली. त्यापैकी कोल्हापूर येथील ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.बाळासाहेब दैनी यांनी केलेल्या अतुलनीय कार्याबद्दल त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला. त्यानंतर सर्व सभासदांनी दिवंगत सभासदांना दोन मिनिटे शांत उभे राहून श्रद्धांजली वाहिली. नंतर श्री.चंद्रकांत कुलकर्णी यांनी गतवर्षाच्या ९ मे ०८ रोजी झालेल्या वार्षिक सभेचा वृत्तांत 'संवाद'च्या जून ०८च्या अंकात छापल्याचे सांगून त्यास मंजुरी देण्याबाबत आवाहन केले. त्यास सर्व उपस्थित सभासदांनी मान्यता दिली.

त्यानंतर त्यांनी मागील वर्षातील कामकाजाचा आढावा घेतला. गतवर्षात एकूण २९१ नवीन सभासद झाले व रु.३,९६,७८२/- इतकी रक्कम सभासद फी व देणगी स्वरूपात जमा झाली. याही वर्षी श्री.पुणेकर यांनी ८० नवीन सभासद नोंदवले. त्यांनी आतापर्यंत १२९९ सभासद नोंदवून आपल्या झोनमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याबद्दल सर्व सभासदांनी टाळयांच्या गजरात त्यांचे अभिनंदन केले.

झोनमधील सर्व जिल्ह्यांमधून वर्षभरात अनेक कार्यक्रम सभासदांसाठी करण्यात येतात. कामकाज बैठका, मान्यवरांची भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम, तिळगूळ समारंभ, सहली, हेल्थ कॅम्पस् इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. त्याचा धावता आढावा त्यांनी घेतला. सोलापूर, सातारा व पौडरोड (पुणे) येथे नवीन दवाखाने चालू करण्यासंबंधीच्या प्रयत्नांची, तसेच अहमदनगर येथे अधिकृत हॉस्पिटलच्या प्रपोजलबद्दल श्री.कुलकर्णी यांनी माहिती दिली. यंदाच्या सर्कल असोसिएशनच्या जुलै महिन्यातील आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन अहमदनगर युनीटने स्वीकारले असल्याची माहिती देऊन त्यांनी अहमदनगर येथील सर्व सभासद ते यशस्वीरित्या पार पाडतील असा आत्मविश्वास व्यक्त केला.

गेल्या वर्षभरात ज्या सभासदांनी वयाची ७५ वर्षे पूर्ण केली अशा सर्वश्री अरविंद साठे, मधुसूदन मुळे, विनय पुणेकर, श्रीराम केळकर, अनील वकील, काशिनाथ नेवाळकर, पी.के.देवधर, फिरोज कियास, भास्कर पेठकर, गजानन चिणे, श्रीराम बर्दापूरकर, व्ही.एस.कांबळे, वसंत दारव्हेकर, बापूराव पवार, सदाशिव क्षीरसागर व सौ.प्रभा अरविंद जोशी या ज्येष्ठ सभासदांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक सत्कार श्री.बी.जी.दांडेकर, श्री.व्ही.एम.गोखले व श्री.व्ही.पी.भावे यांचे हस्ते करण्यात आला. श्री.एस.पी.बर्वे यांनी ऋग्वेदातील व श्रीसूक्तातील ऋचांचे पठण करून सर्वांना दीर्घायुरारोग्य लाभो अशी सर्वांतर्फे प्रार्थना केली. सत्करार्थींच्यावतीने श्री.श्रीराम केळकर यांनी असोसिएशनच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

त्यानंतर श्री.दांडेकर व श्री.गोखले यांनी फेडरेशन स्तरावर आपल्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात चालू असलेल्या घडामोडींविषयी व चालू कोर्ट-केसेस संबंधी माहिती दिली. श्री.दांडेकरांनी आपल्या भाषणात त्यांच्या स्वानुभवावर आधारित दृष्टिदानाचे महत्त्व पटवून देऊन सर्वांनी नेत्रदान आवर्जून करण्याचे आवाहन केले.

त्यानंतर सर्कल ट्रेझरर श्री.बर्वे यांनी सभासदांना आवाहन केले की, आपल्या असोसिएशनकडे 'संवाद'चे बरेच अंक दरमहा वितरीत न होता, सभासद पत्ता सोडून गेल्या कारणाने परत येत असतात. अशा सभासदांचे बदललेले पत्ते मिळविण्यासाठी सर्व सभासदांचे सहकार्य आवश्यक आहे. तसेच हिशोबाचे दैनंदिन काम करण्यासाठी

ऑफिसमध्ये कार्यकर्त्यांची गरज आहे. तरी अशा स्वेच्छेने काम करण्याची तयारी असलेल्या सभासदांनी आपल्या कार्यालयात त्वरित संपर्क साधावा अशी विनंती त्यांनी केली.

श्री.विजय भावे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केल्यावर श्री.व्ही.एन.कुलकर्णी, उपाध्यक्ष, यांनी आभार प्रदर्शन केले. सभेचे सूत्रसंचालन श्री.अशोक पंडित यांनी केले. सभेनंतर सभासदांच्या मनोरंजनासाठी पुणे येथील 'स्नेह-मंडळा' तर्फे प्रा.प्रकाश जोग यांनी जुन्या हिंदी चित्रपट गीतांवर आधारित एक दृक्-श्राव्य कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात सर्व सभासद जुन्या भावविश्वात रमून गेले होते.

चंद्रकांत कुलकर्णी
सेक्रेटरी

* * * * * * *

**स्टेट बँक पेन्शनर्स सांस्कृतिक मंडळ, ठाणे-मुलुंड**

आमच्या मंडळाच्या योजनेप्रमाणे आम्ही दर दोन महिन्यांनी एकदा आपल्या पेन्शनर्सपैकी एकाचा करमणुकीचा/सांस्कृतिक/उद्बोधक कार्यक्रम आयोजित करीत असतो. त्याप्रमाणे ७ एप्रिल ०९ रोजी आपल्या ठाणे ऑफिसच्या हॉलमध्ये आपल्या सर्कल असोसिएशनचे सेक्रेटरी श्री.लव्हिंगकर यांनी, 'अरुणाचल प्रदेश व तेथील जनजीवन' या विषयावरील 'स्लाइड शो' सादर केला. या नावीन्यपूर्ण व उद्बोधक कार्यक्रमाला श्री.लव्हिंगकर यांच्या ओघवत्या निवेदनाची साथ लाभल्याने कार्यक्रम खूपच रंगला. सुमारे ५०-६० पेन्शनर्स सभासदांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

**यापुढील कार्यक्रम : मंगळवार दि.२ जून २००९ रोजी सायंकाळी ५.०० वाजता श्री.चंद्रशेखर दामले यांचे सुगम संगीत आयोजित केले आहे याची सभासदांनी नोंद घ्यावी.**

- शरद गडकरी, सचिव (ठाणे-मुलुंड सांस्कृतिक मंडळ)

*********

**स्टेट बँक पेन्शनर्स क्लब, नागपूर**

नागपूर क्लबची मासिक सभा सोमवार दि.२३ फेब्रुवारी ०९ रोजी क्लबचे अध्यक्ष श्री.रामभाऊ कोल्हटकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सुरूवातीला श्री.वझिरानी यांनी स्टेट बँक पेन्शनधारकांना त्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांविषयी अद्ययावत माहिती दिली. तसेच श्री.घाणेकर यांनी संस्थेच्या ध्येयधोरण विषयीचा तसेच आगामी कार्यासंबंधीचा तपशील सभासदांना दिला.

या सभेत विभिन्न क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या स्टेट बँक परिवारातील व्यक्तींचा / सभासदांचा गौरव करण्यात आला. श्रीराम अर्बन को-ऑप. बँकेच्या संचालक पदावर नियुक्ती झाल्याबद्दल श्री.विजय गडकरी व श्री.अरूण माणकेश्वर यांचा, तसेच दै.'तरूण भारत'च्या संचालकपदावर नियुक्ती झाल्याबद्दल श्री.पत्की यांचा सत्कार करण्यात आला. त्याच बरोबर निवृत्तीनंतर चार वर्षे आसाम व अरुणाचल प्रदेश येथे राहून विवेकानंद केंद्राच्या मार्फत समाजसेवा करणारे श्री.प्रकाश खांडेकर आणि सुरेंद्रनगर शाखेत कार्यरत असलेल्या श्री.पराग घोंगे यांचा त्यांनी २००८ सालचे उत्कृष्ट वाङमय निर्मितीचे तीन पुरस्कार मिळविल्याबद्दल सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देतांना श्री.माणकेश्वर म्हणाले की रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर तज्ज्ञ व्यक्तींची नेमणूक आवश्यक असल्यामुळे, त्यांचा स्टेट बँकेतील प्रदीर्घ अनुभव लक्षात घेऊन त्यांना श्रीराम सह. बँकेच्या संचालक पदावर काम करण्याची विनंती करण्यात आली व ती त्यांनी स्वीकारली. श्री.गडकरी हे श्रीराम सह. बँकेच्या निवडणूकीत उभे राहून निवडून आले असल्याने, त्यांनी त्यांच्या निवडणुकीतील अनुभवांचे कथन केले. श्री.खांडेकर यांनी त्यांच्या पूर्वांचलातील वास्तव्यातील अनुभव कथन करून, ज्यांना शक्य असेल त्यांनी अशाप्रकारे समाजसेवा करण्याचे व आपला वृद्धापकाळ अधिक संपन्न करण्याचे आवाहन केले. श्री.पत्की यांनी त्यांचा रा.स्व.संघाशी असलेल्या बंधामुळे त्यांची 'तरूण भारत' या वृत्तपत्राच्या संचालक पदावर नियुक्ती झाल्याचे सांगितले. श्री. घोंगे म्हणाले कीं सत्काराची फुले शुभेच्छांसह अलगद जबाबदारीही घेऊन येतात. आपल्या क्षेत्रात अधिक तन्मयतेने काम करण्याचे बळ अशा प्रोत्साहनातून मिळते. त्यांनी त्यांची समकालीन संदर्भाची एक कथा वाचून दाखविली. ज्येष्ठ सभासद श्री.नानासाहेब मोरे यांनी सर्वश्री माणकेश्वर, गडकरी व पत्की यांचा तर श्री.बाळासाहेब चौबे यांनी सर्वश्री खांडेकर व घोंगे यांचा हार्दिक सत्कार केला. श्री.तात्यासाहेब व्यवहारे यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या व असेच यश निरनिराळ्या क्षेत्रात आपल्या आयुष्यात मिळवावे अशी सदिच्छा व्यक्त केली. श्री.अरूण महात्मे यांनी सभा समारोपाचेवेळी सर्वांचे आभार मानले.

- श्रीराम घाणेकर, सचिव (नागपूर क्लब)

# युनिट वार्ता

**बुलडाणा युनिट -**

बुलडाणा जिल्हा युनिटची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि.७ एप्रिल २००९ रोजी खामगाव येथे 'महावीर जयंती'च्या दिवशी अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षपदी नागपूर झोनल सब्-सेंटरचे अध्यक्ष श्री.एस.जी.देसाई हे होते. प्रमुख अतिथी म्हणून बँकेचे बुलडाणास्थित सहा.महाप्रबंधक श्री.अजित लोकूर, खामगाव शाखाप्रबंधक श्री,अनीत भिडे, तसेच नागपूर झोनल सब्-सेंटरचे सेक्रेटरी श्री.जयंत वकील, उपाध्यक्ष श्री.एम.जी.मुनोत, जिल्हा प्रतिनिधी श्री.वाय.डी.गुप्ता, स्थानिक युनीटचे अध्यक्ष श्री.वराडे, सचिव श्री.मोरे यांची या सभेस मंचावर विशेष उपस्थिती होती.

प्रथम मंचावरील सर्व मान्यवरांचे खामगाव युनीटतर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर जिल्ह्यातील निधन पावलेल्या सभासदांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. सभेत चिखलीस्थित ज्येष्ठ सदस्य श्री.विष्णुपंत कारंजेकर यांचा वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल प्रमुख अतिथी श्री.लोकूर यांचे हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हार्दिक सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी श्री.कारंजेकर यांनी असोसिएशनचे आभार मानून रु.५०१/- ची देणगी दिली.

अध्यक्ष श्री.देसाई यांनी आपल्या भाषणात पेन्शन बाबतीत व कोर्ट केसेस बाबत विस्तृत माहिती दिली. श्री.जयंत वकील यांनी सभासदांना सर्व योजनांची व नागपूर झोनल सब्-सेंटरच्या कार्याविषयी माहिती दिली. सभासदांना कांहीही अडचण आल्यास त्याचे निवारणासाठी त्यांना त्वरित संपर्क साधावा असे आवाहन केले. तसेच बुलडाणा जिल्ह्याच्या, श्री.मुनोत यांच्या नेतृत्वाखालील, असोसिएशनच्या उत्तम कामगिरीबद्‌ल कौतुक केले.

खामगाव शाखेचे व्यवस्थापक श्री.भिडे यांनी सर्व सभासदांना बँकेतील सर्वप्रकारच्या कामासाठी सर्वतोपरी मदत कारण्याचे आ?ासन दिले. प्रमुख अतिथी श्री.लोकूर यांनी आपल्या भाषणात उपस्थित ज्येष्ठ मंडळींना अभिवादन करून पेन्शनर्सच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आ?ासन दिले. त्याबद्दल सर्व सभासदांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी बोलतांना श्री.मुनोत यांनी सभासदांच्या नेहमी येणाऱ्या अडचणींचा उ?ेख करून त्या सोडविण्यासाठी असोसिएशनचे पदाधिकारीही मदत करतील असे सांगितले. या सभेस जिल्ह्यातील ५४ सदस्य उपस्थित होते. श्री.बांगडबट्टी यांनी आभारप्रदर्शन केले. शेवटी सभेच्या उत्कृष्ट सूत्र संचालनाबद्दल सौ.सुचेता हातेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. सहभोजनानंतर सभेची सांगता झाली.

एम.जी.मुनोत
उपाध्यक्ष, नागपूर झोनल सब्-सेंटर

## अभिनंदनीय

आपले एक ज्येष्ठ कार्यकर्ते श्री.दत्तात्रय क्षीरसागर (पुणे) यांचा नातू चि.शुभम श्रीकांत क्षीरसागर (इ.९वी) यास महाराष्ट्र स्टेट कौन्सिल ऑफ एक्झॉमिनेशन, पुणे यांचेकडून अभ्यासातील प्रावीण्याबद्दल विशेष शिष्यवृत्ती मिळाली आहे. त्याबद्दल चि.शुभमचे अभिनंदन! असेच यश उत्तरोत्तर त्यास मिळो अशी असोसिएशनतर्फे शुभेच्छा.

- सेक्रेटरी

## स्वेच्छा-निवृत्ती घेतलेल्या सभासदांचेसाठी

स्टेट बँकेच्या व्यतिरिक्त इतर राष्ट्रीयीकृत बँकांच्या 'स्वेच्छा-निवृत्ती' योजनेतील तरतुदींनुसार कांही कर्मचाऱ्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. परंतु त्यांना स्वेच्छानिवृत्तीचा पाच वर्षाचा फायदा बँकांनी दिला नव्हता. अशा तरतुदींविरोधात इतर बँकांतील सेवानिवृत्तांच्या संघटनांनी विविध राज्यातील हायकोर्टात दावे दाखल केले होते. कांही ठिकाणी न्यायालयाने निवृत्तांच्या बाजूने निकाल दिला होता. याबाबत सुप्रीम कोर्टाने सर्व हायकोर्टातील दावे एकत्र करून ते एकत्रितपणे सुनावणीसाठी दाखल करून घेतले होते. सुप्रीम कोर्टाने नुकताच (इतर बँकांतील) स्वेच्छा-निवृत्तांच्या बाजूने निकाल दिल्याची बातमी स्थानिक वृत्तपत्रांमधून आली होती. त्यावर आपल्या कांही सभासदांनी विचारणा केल्यावरून खुलासा करीत आहोत की,

हा निकाल स्टेट बँकेच्या स्वेच्छानिवृत्तांसाठी नाही याची कृपया नोंद घ्यावी.

- सेक्रेटरी

# डॉ.आंबेडकर, स्वा.सावरकर व लोकशाही

लोकसभेच्या निवडणुकांची रणधुमाळी नुकतीच संपली आहे. जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश म्हणून आपल्याला आपल्या देशाचा अभिमान वाटतो. पण ही लोकशाही अधिक प्रगत व परिपक्व होण्यासाठी देशात सुशिक्षित व संस्कारसंपन्न वा किमान साक्षर लोक तरी बहुसंख्येने असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने आपल्याला खूप पल्ला गाठायचा आहे. लोकांचे, लोकांसाठी व लोकांमार्फत म्हणजेच (लोकांनी निवडून दिलेल्या) लोकप्रतिनिधींच्याद्वारे चालविले जाणारे राज्य (शासन) ही लोकशाहीची साधी, सरळ, सोपी व सर्वमान्य व्याख्या. म्हणजेच लोकशाहीमध्ये लोकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.

आपण स्वीकारलेल्या आपल्या लोकशाही किंवा लोकसत्ताक राज्य पद्धतीच्या संदर्भात आम्हाला आज दोन महापुरुषांची तीव्रतेने आठवण होत आहे. ते दोन महापुरुष म्हणजे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर.

आपली लोकशाही शासनप्रणाली ज्या राज्यघटनेवर आधारित आहे त्या भारतीय राज्यघटनेचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे प्रमुख शिल्पकार आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयींवर भारताची राज्यघटना उभी आहे. जगातील विविध राज्यघटनांचा तौलनिक अभ्यास करून आपली राज्यघटना बनविलेली आहे. ठराविक कालावधीनंतर होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका आपल्या लोकशाहीप्रणालीला अनुसरूनच असतात. लोकांनी म्हणजे जनतेने आपला मतदानाचा पवित्र अधिकार बजावून आपले प्रतिनिधी निवडून द्यायचे आणि या बहुमताने निवडून आलेया लोकप्रतिनिधींमार्फत राज्यकारभार चालवायचा ही लोकसत्ताक राज्यपद्धती आता आपल्या अंगवळणी पडलेली आहे. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर आपल्या राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्वा. सावरकर या दोन तत्त्वज्ञ विचारवंतांचे लोकशाहीच्या संदर्भातील विचार त्यांच्याच शब्दात जाणून घेणे उद्‌बोधक ठरेल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना लोकशाही शासनप्रणाली आदर्शवत वाटत होती. ते लोकशाहीचे कट्टर पुरस्कर्ते होते. डॉ.बाबासाहेब म्हणतात, ''लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल रक्तविरहित मार्गांनी घडवून आणणारी शासनपद्धती म्हणजे लोकशाही होय. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव ही लोकशाहीची प्राणतत्त्वे आहेत.'' याच संदर्भात विभूतिपूजा व विचार पूजा याविषयी डॉ.आंबेडकर म्हणतात, ''विभूतिपूजा ही भक्तांना नीतीभ्रष्ट करते व म्हणून ती देशाला मारक आहे.'' डॉ.आंबेडकरांच्या मते विभूति-पूजा एकाधिकारशाहीला-हुकूमशाहीला जन्म देते, तर विचारांची पूजा लोकशाही बळकट करते. डॉ.आंबेडकर यांना म्हणूनच विभूति-पूजा किंवा व्यक्तिपूजा अमान्य होती. विभूतिपूजेपेक्षा विचारांची पूजा त्यांना प्रिय व पूज्य वाटत होती.

डॉ.आंबेडकर म्हणतात, ''मी लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता आहे. मला विभूतिपूजा कशी आवडेल ? विभूतिपूजा हा लोकशाहीचा विपर्यास आहे. पुढारी लायक असेल तर त्याबद्दल कौतुक, प्रेम, आदर या भावना बाळगायला हरकत नाही. परंतु तेवढ्यानेच त्या पुढाऱ्यांचे आणि त्याच्या अनुयायांचे समाधान व्हावयास हवे. पण पुढाऱ्यांची देवाप्रमाणे पूजा करणे मला बिलकुल मान्य नाही. त्यामुळे त्या पुढाऱ्यांबरोबर त्यांच्या भक्तांचाही अध:पात होतो.'' डॉ.आंबेडकरांचे हे विचार आपणा सर्वांनाच अंतर्मुख केल्यावाचून रहात नाहीत.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचे लंडनमध्ये क्रांतिकार्य चालू असताना बॅरिस्टरीचा नि आय.सी.एस.चा अभ्यास करणारे त्यांचे तरूण क्रांतिकारक सहकारी भारताला स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटना कशा प्रकारची हवी याविषयी अभ्यासपूर्ण विचारविनिमय नियमीत बैठकीतून करीत असत. स्वा.सावरकर म्हणतात, ''कोणतीही राज्यपद्धती झाली तरी तीत राष्ट्राचे कल्याण कोणत्या मार्गाने साधता येईल याविषयी पक्षभेद व मतभेद हे असणारच. त्यात काही हानी नाही. उलट ते मतभेद नि:स्वार्थ व देशहितप्रेरित असले तर उपकारकच ठरतात. परंतु स्वराज्यप्रस्थापनेनंतर मात्र ते मतभेद कितीही तीव्र असले तरी ते आपले सारे मतभेद मतपेटीतच सामावले पाहिजेत. मात्र त्या मतपेटीचे बूड फुटके नाही ना ते कटाक्षाने पाहावे. पण हे दायित्व जनतेपेक्षाही ज्या पक्षाच्या हाती घटनात्मकरित्या राज्यकारभार सोपविला जाईल. त्या सत्ताधारी पक्षावरच अधिक आहे.'' स्वा.सावरकर Ruling Partyआणि Opposion Party या शब्दांना 'बहुमतीय पक्ष' (राज्यकर्ता पक्ष) आणि 'अल्पमतीय पक्ष' असं संबोधिण्यास सांगतात. कारण विरोधी पक्ष संबोधिल्यास विरोधासाठी विरोध केला जाईल. विरोधकाची भूमिका बजावताना ज्या गोष्टी देशहितकारक आहेत त्यांना राज्यधारक पक्षाला मन:पूर्वक पाठिंबा देऊन सहकार्य करणे विरोधी पक्षांकडून सावरकरांना अपेक्षित आहे.

सावरकर म्हणतात, ''लोकसत्ता (Republic) हा शब्द Republican (लोकांची वस्तु) यापासून उत्पन्न झाला आहे. म्हणजेच राष्ट्राची सत्ता राष्ट्राचेच हाती असणे असा त्याचा अर्थ आहे. याहून पवित्र शब्द कोणता असणार ?''

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर काय किंवा स्वातंत्र्यवीर सावरकर काय, दोघांचीही राष्ट्रनिष्ठा जाज्वल्य नि समाजचिंतन सखोल होते. त्यामुळे त्यांचे वरील विचार आपल्याला सदैव मार्गदर्शकच ठरतील.

**- क्रांतिसेन रामचंद्र आठवले**
भ्रमणध्वनी - ९८६९९४१६९१

# ‘संवाद’ लेख स्पर्धा २००९ - निकाल

‘संवाद’च्या जाने.२००९ च्या अंकात सभासदांसाठी ‘सेवानिवृत्ती झाली पुढे काय ?’ किंवा ‘माझ्या कल्पनेतील सुखी संसार’ या विषयांवर एक लेख स्पर्धा जाहीर केली होती. या स्पर्धेसाठी पुरुष सभासदांकडून ३० लेख तर स्त्री सभासदांकडून २२ असे एकूण ५२ लेख आले. स्पर्धेत भाग घेतलेल्या सभासदांची नावे खालीलप्रमाणे -

**पुरुष विभाग -** १) श्री.प्रकाश गाडगीळ, पुणे २) श्री.विश्वास मोरेश्व भागवत, नाशिक ३) श्री.दत्तात्रय रा.क्षीरसागर, पुणे ४) श्री.विजय विठ्ठल वैद्य, पुणे ५) श्री.घन:शाम ना.जोशी,पुणे ६) श्री.यशवंत ह.डबीर, पुणे ७) श्री.सु.र.जैन, औरंगाबाद ८) श्री.मदनलाल काबरा, जळगाव ९) श्री.मधुकर ग.रानडे, नाशिक १०) श्री.सिताराम तेरवाडकर, सांगली ११) श्री.चंद्रकांत नी.दाते, बोरिवली, मुंबई १२) श्री.अरूण शं.तुळजापूरकर, पुणे १३) श्री.श्याम भणगे, नाशिक १४) पुरुषोत्तम नि.देशपांडे, अमरावती १५) श्री.शरद य.महाबळ, पुणे १६) श्री.चंद्रकांत प्र.देखणे, पुणे १७) श्री.प्रकाश रिसबूड, पुणे १८) श्री.रामचंद्र दाजी जगदाळे, पाडळी, सातारा १९) श्री.चंद्रकांत ग.सरनाईक, नाशिक २०) श्री.विठ्ठल रा.कट्टी, सांगली २१) श्री.चिंतामणी ना.गोखले, सांगली २२) श्री.विनय पाटील, अंधेरी-मुंबई २३) श्री.अरुण अनंत काकडे, पुणे २४) श्री.संतोष ल.गोरे, सावेडी-अहमदनगर २५) श्री.श्रीकांत पां.तरडे, पुणे २६) श्री.अनंत त्र्यं.भाटे, संगमनेर २७) श्री.अरविंद श्रीधर पुजारी, सोलापूर २८) श्री.आर.आर.कुलकर्णी, कोल्हापूर २९) श्री.अशोक वा.जोशी, डोंबिवली (पू.) ३०) श्री.विजयकुमार म.चित्रे, पुणे.

**स्त्री विभाग -** १) सौ शैलजा वि.टेंभुर्णीकर, अहमदनगर २) सौ.मंगला वि.पुणतांबेकर, पुणे ३) सौ.वर्षा श.जोशी, डोंबिवली (पू) ४) श्रीमती नीलिमा दि.कुलकर्णी, पुणे ५) सौ.अंजली सि.तेरवाडकर, सांगली ६) सौ.शशी स्वामी, पुणे ७) सौ.सुषमा सु.किर्तने, अहमदनगर ८) सौ.अरुंधती लोकरे, पुणे ९) सौ.ज्योती डुबे, अमरावती १०) सौ.नीलिमा श्री.खरंगटे, पणजी गोवा ११) श्रीमती गिरिजा र.पागनीस, माहिम,मुंबई १२) सौ.सुमती गं.महाबळ, सांगली १३) सौ.सुचेता ध.हातेकर, खामगांव १४) सौ.नलिनी चं.सरनाईक, नाशिक १५) सौ.मालती मा.पांडे, नागपूर १६) सौ.जगदेवी म.शेटे, सोलापूर १७) सौ.मनीषा दि.कुलकर्णी, नाशिक १८) अनुजा नाईक, मुंबई १९) सौ.प्रतिभा मु.सराफ विलेपार्ले, मुंबई २०) सौ.विदुला वि.ठुसे, ठाणे २१) सौ.सुनंदा र.तळणीकर, यवतमाळ २२) सौ.रजनी ज.धर्माधिकारी, गारखेडा, औरंगाबाद

**स्पर्धेविषयी थोडसं मनोगत -**

**‘सेवानिवृत्ती झाली पुढे काय ?’** या विषयावर पुरुष विभागातून एकूण २३ लेख आले तर स्त्री विभागातून ८ लेख आले. विषय परिचित आणि जवळचा असल्यामुळेच सभासदांनी उत्तम प्रतिसाद दिला असावा असे वाटते. सर्व लेख वाचल्यावर प्रामुख्याने एक गोष्ट जाणवली की, बऱ्याच सभासद लेखकांनी आपण स्वत: निवृत्त झाल्यावर काय करतो यापेक्षा इतरांनी निवृत्त जीवन कसे जगावे याचेच विवेचन, त्यासबंधीच्या सूचना केलेल्या आढळल्या. काही लेखकांनी तर स्वयंसेवी संस्थांची यादी सादर करून त्या काय कार्य करतात यावरच भर दिला. वास्तविक निवृत्त झाल्यावर आपण स्वत: काय करत आहोत, एखादा नवीन छंद, कला आत्मसात केली का ? त्यात आलेल्या अडचणी, त्यावर केलेली मात किंवा अंगीकारलेले सामाजिक कार्य करताना लोकांशी आलेला संपर्क, त्यांच्याशी झालेला संवाद, विचारांची देवाण घेवाण त्यातून नवीन काही शिकायला मिळाले का ? या संबंधीचा उल्लेख फारच थोड्या लेखात आढळला. निवृत्ती घेतल्यावर घरातले वास्तव्य वाढतेच. विशेषत: पुरुषांच्या स्वयंपाकघरात जास्त फेऱ्या होतात अशी सर्वसाधारणपणे स्त्री वर्गाची तक्रार असते. मग कुरबुरी, खटके, रुसवे फुगवे, अबोला धरला जातो. हे सर्व तसे तात्पुरतेच असते. या व अशा इतर अनुभवांचे विनोदी पद्धतीने इतर मजकुराबरोबर लेखात सादरीकरण झाले असते तर लेख अधिक परिपूर्ण व मनोरंजक झाले असते. तरी पण सभासदांच्या आपापल्या कुवतीनुसार दर्जेदार लिहिण्याच्या प्रयत्नाला दाद द्यायलाच हवी.

**‘माझ्या कल्पनेतील सुखी संसार’** - या विषयावर पुरुष विभागातून ७ लेख आले तर स्त्री विभागातून १४ लेख स्पर्धेमध्ये दाखल झाले. स्त्री किंवा पुरुष प्रत्येकाचे विवाह झाल्यावर आपल्या भावी संसाराविषयी एक स्वप्न असते, काही कल्पना असतात. स्पर्धेसाठी हा विषय निवडताना आमच्यासमोर नुसता कल्पनेतील संसार नव्हता. आपल्या सुखी संसाराबद्दल केलेल्या कल्पना, पाहिलेली स्वप्ने व आपला वास्तवातील संसार यांची सांगड घालणे अपेक्षित होते. संसारात सर्वच ‘ऑल वेल’ असत नाही. किरकोळ मतभेद, वादविवाद आपलंच म्हणणं खरं आहे हे ठसवण्याचा अट्टाहास हे व असे प्रसंग संसारात येतातच. हे टाळण्यासाठी केलेल्या तडजोडी, स्वभावात आणलेले सामंजस्य या व अशा प्रसंगांचा समावेश लेखकांनी आपल्या लेखात केला असता तर लेख एकसाची न होता रंजक झाले असते. तरी पण लेखक सभासदांनी घेतलेले कष्ट, लिहिण्याची जिद्द निश्चितच प्रशंसनीय.

**लेख स्पर्धेचा विषय -** ***(स्त्री, पुरुष सभासदांसाठी)***

१) ‘सेवानिवृत्ती झाली पुढे काय ?’ किंवा

२) ‘माझ्या कल्पनेतील सुखी संसार’

**पुरुष विभाग -**

१) **प्रथम क्रमांक** - रु. ५००/- (रु.पाचशे फक्त)
श्री. यशवंत हरी डबीर, पुणे.

२) द्वितीय क्रमांक - रु. ३००/- (रु.तीनशे फक्त)
श्री. श्रीकांत पां. तरडे, पुणे.

३) **तृतीय क्रमांक** - रु. २००/- (रु.दोनशे फक्त)
श्री.मदनलाल काबरा, जळगांव.

**स्त्री विभाग -**

१) **प्रथम क्रमांक** - रु. ५००/- (रु.पाचशे फक्त)
सौ. सुचेता धनंजय हातेकर, खामगांव.

२) **द्वितीय क्रमांक** - रु. ३००/- (रु.तीनशे फक्त)
सौ.मनीषा दि.कुलकर्णी, नाशिक.

३) **तृतीय क्रमांक** - रु. २००/- (रु.दोनशे फक्त)
सौ. शशी स्वामी, पुणे.

सर्व पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन. विजेत्यांना पारितोषिके या वर्षीच्या सर्वसाधारण सभेत अध्यक्षांच्या हस्ते देण्यात येतील. त्यांना पत्राने तसे स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. पारितोषिक-पात्र लेखांना 'संवाद' मध्ये क्रमश: प्रसिद्धी दिली जाईल. ज्या स्त्री पुरुष सभासदांनी 'संवाद' च्या लेख स्पर्धेत भाग घेतला त्या सर्वांचे पुन्हा एकदा आभार.

**- संपादक मंडळ 'संवाद'**

## आई

काय लिहावं, कसं लिहावं, कुठून लिहावं
शब्द सापडत नाही ही अडचण नाही
काळजी, मोजक्या शब्दात मांडणी करण्याची
जेणेकरून आई या शब्दाचा अवमान होणार नाही ।
मूर्तिमंत साध्वीचं रूप, कष्टाळू, मायाळू
सर्व कुटुंबीयांसाठी सतत झटणारी
मुलांचे हट्ट पूर्ण करण्यासाठी वेळ पडली तर
स्वत:ला गहाण टाकणारी ।
गर्भधारणा झाल्यापासून अनेक गोष्टी सहन करणारी
प्रसूतीवेदनासुद्धा, गोड मानत बाळाची वाट पाहणारी
निसर्गाने दिलेल्या पान्ह्यातून वात्सल्य सोडणारी
आणि कुशीत घेऊन ममतेने माया लावणारी ।
बाळाच्या प्रत्येक जाणीवेचं
तिला आपुसकच ज्ञान होत असतं
ह्या बिनतारी संदेशाचं ग्रहणकेंद्र
आईच्याच हृदयात दडलेलं असतं ।
आजकालच्या आईचं रूप थोडंसं बदललं आहे
ती घरातली चूल सांभाळूनही ऑफिसात आली आहे
यातही तिची त्यागी वृत्ती, स्वार्थ तर मुळीच नाही
कारण आपलीच जबाबदारी तिने वाढवली आहे ।
हे सर्व मुख्यत्वे पाल्यांसाठीच कारण
महागाई गगनाला भिडली आहे
कौतुकास ती नक्कीच पात्र आहे कारण
काळाची पावलं तिनंच ओळखली आहेत ।
परिवर्तन हा निसर्गाचा नियम आहे
पण ही आई मात्र कधीच बदलली नाही
या आईची जाण ज्यांनी ठेवली त्यांनाच कळले
आईच्या पायातच स्वर्ग आहे, दुसरा कुठेच नाही ।

**- शरद महाबळ,** भ्रमणध्वनी - ९३७२४२८३२२

खास पावसाळ्या निमित्त
करावली दर्शन
कोस्टल कर्नाटक
या मध्ये कारवार-सदाशीवगड-अंकोला-गोकर्ण
इडगुंजी-मुर्डेश्वर-सिरसी-बनवासी
मागोड व जोग फॉलस्
इत्यादी स्थल दर्शन होईल
सहल खर्च रु. ४३५०/-
Rail fare extra as/class
दि. २२ ते २६ जुलै,५ ते ९ ऑगस्ट

मडीकेरी दर्शन
कुर्ग
४ रात्र ५ दिवस
सोबत तळकावेरी
नागरहोळे
दि. २६ ते ३१ जुलै,९ ते १४ ऑगस्ट
सहल खर्च रु. ७५००/-
Rail fare extra as/class

फक्त पत्ते (Playing cards) खेळणाऱ्यांकरीता..
RUMMY TOUR
दर महिन्याच्या पहिल्या शनिवार/रविवारी रमी/ब्रिज खेळणाऱ्यांकरीता
मुंबई पासून १०० कि.मी. परिसरात दोन दिवसाची कार्निव्हल .
शनिवारी सकाळी निघून रविवारी संध्याकाळी परत
Rs: 21,000/- for full year (12 tour)
Rs: 11,000/- for half year (6 tour)
Including night stay,breakfast-lunch-dinner& travelling
महिलांसाठी स्वतंत्र ग्रुप

नोंदणी व अधिक माहिती करीता संपर्क
आयोजकः राजेश रानडे.
अनोळखी जगाची ओळख
TOURWAYS
022 65 281 281
92232 73496
C-305 Palm Acres.M.P.Rd,Mulund east Mumbai 81

# संवाद लेख स्पर्धा २००९

(स्त्री विभाग - प्रथम पारितोषिक विजेता लेख)

## ''सेवानिवृत्ती झाली - पुढे काय ?''

'सेवानिवृत्ती म्हणजे वृत्तीत बदल'. आजपर्यंत आपली जी जीवनशैली होती, त्यात केलेला मर्यादित बदल म्हणजे निवृत्ती. सेवानिवृत्तीनंतरच्या जीवनाला 'बोनस' समजायला हरकत नाही आणि ती जर स्वेच्छानिवृत्ती असेल तर मग नक्कीच. बोनस म्हणून मिळालेल्या रकमेचा उपयोग जसा आपण हौसेखातर करतो तसा निवृत्तीनंतरच्या वेळेचा उपयोगदेखील ऐच्छिक गोष्टींसाठी करता येईल. जगण्यासाठी धडपडताना जगणंच कसं हरवून जातं. संसार सांभाळत नोकरी करणं म्हणजे तारेवरची कसरत. माझी मैत्रीण तर म्हणायची, ''अग घरी गेल्याबरोबर हातात ढाल-तलवार (पोळपाट-लाटणं) घेऊन लढाईला सज्ज व्हावं लागतं. (अरे संसार संसार !) अर्थात स्टेट बँकेतील नोकरी खूपच सुखावह. पण तरीही गृहिणीपद सांभाळून नोकरी करताना स्त्रीशक्तीचा ऱ्हास होतोच. मुलांची शिक्षणं आटोपून स्थैर्य आलेलं. मेनोपॉझमुळे शारीरिक व्याधी सुरू झाल्या. डिप्लॉयमेंट पॉलिसीचं आगमन झालं. स्वेच्छानिवृत्ती घ्यायचं ठरवलं अन् डिसेंबर २००६ ला निवृत्त झाले.

सेवानिवृत्त झाले; आता सर्व काही संपलं असं क्षणभर वाटलं. पण म्हणतात ना, "To the optimist, all doors have handles and hinges and to the pessimist, all doors have latches and locks." अन् मग सुरू झालं निवृत्तीकडे सकारात्मक वृत्तीनं पाहणं. अन् काय आश्चर्य ! या कवितेच्या ओळी खऱ्या वाटायला लागल्या -

''निवृत्तीचा परि काळ सुखाचा
विरंगुळ्याचा अन् श्रमसाफल्याचा ।
अहंभाव, कटू स्मृती विसरण्याचा ।।
समाजासाठी काहीतरी करण्याचा ।
अन् राहिलेले काही क्षण टिपण्याचा ।।''

सर्वप्रथम आनंद कशाचा झाला असेल तर २८ वर्षांनी का होईना यांना घरी वाट पाहणारी बायको अनुभवयाला मिळाली. नोकरीत असताना हाल झाले असं नाही, पण प्रत्येक कृती करताना त्यात कर्तृत्वाची झालर असायची अन् आता रसिकतेची. हे गमतीनं म्हणतातदेखील, ''मला एकाच जन्मात दोनही बायका मिळाल्या, नोकरी करणारी व नोकरी न करणारी.'' झाला की नाही निवृत्तीचा फायदा.

अर्थात हा आनंद फार काळ टिकला नाही. सहा महिन्यांनी यांनी देखील क्रॉनिक गुघडेदुखीमुळे एक्झिट ऑप्शन स्वीकारलं. माझं वय ५१, ह्याचं ५४. तसं म्हटलं तर दोघंही तरुणच (?). दोनही मुलं परगावी, खामगावला आम्ही दोघंच. घरात नुकतीच लक्ष्मी (सून) आलेली. पण सहवास नाही. सासूबाई पण आता अकोल्याला, घरी असतात.

आजकाल घरोघरी हेच चित्र दिसतं. गेली तीस वर्ष अनुभवलेलं वेगवान आयुष्य. सर्व काही नीटच व्हायला हवं हा अट्टाहास. त्यामुळे तब्येती थोड्या नरमगरमच. निवृत्तीनंतर जाणवलं, 'उत्तम आरोग्य हीच खरी संपत्ती.' वस्तुस्थिती अशी आहे की पैशाच्या मागे धावताना आपण आरोग्य गमावतो अन् नंतर ते आरोग्य मिळविण्यासाठी पैसा गमावतो. म्हणून आता तरी तब्येतीकडे लक्ष द्यायचं ठरवलं. प्राणायाम, योगासने, नामस्मरण, हास्ययोग, सकाळ-संध्याकाळ फिरणं, आरोग्यदायी रस सेवन या सर्वांच्या आधारे 'स्वास्थ्य सुधार' कार्यक्रम राबवणं सुरू झालं. छान वेळ जाऊ लागला. प्रसन्नता वाढून थकलेलं शरीर ताजंतवानं होऊ लागलं. शरीराचं कुरकुरणं कमी झालं. स्त्री असो अथवा पुरूष, कुणालाच पन्नाशी आली तरी वाढत्या वयाच्या खुणा नको असतात. म्हणतात ना-

''उठल्या सुटल्या देऊ नको ग, भान मला वाढत्या वयाचे ।
असेच आहे धुंदपणाने, वयास चुकवित फुलवायचे ।''

दुपारचा निवांत वेळ साहित्य वाचनात, थोडंफार लिहिण्यात, दूरदर्शन बघण्यात छान जाऊ लागला. बागकाम, हार व गजरे करणे, मैत्रिणींशी चर्चा करणे यामुळे वेळ अपुरा वाटू लागला. एकंदर गृहिणीपद उपभोगू लागले. खामगावचे सामाजिक व सांस्कृतिक वातावरण खूप चांगले आहे. दोन-तीन सक्रिय महिला मंडळे, राष्ट्र सेविका समिती व विदर्भ साहित्य संघ या सर्व संस्थांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम होतात. त्यात स्थानिक कलावंतांना देखील वाव मिळतो. वक्तृत्व, वादविवाद, कथाकथन, अभिनय याची मुळात असलेली आवड जोपासता येऊ लागली. आता काय रिकामीच असतेस, मुलंही छान सेटल झाली आहेत, शिवाय बाहेर आहेत असं म्हणून विविध जबाबदाऱ्या देण्यात आल्या. राष्ट्र सेविका समितीच्या प्रारंभिक शिबिराची कार्यवाह झाले. विविध आर्थिक स्तरातील शंभर मुलींचं निवासी शिबिर होतं. वक्तृत्वाची आवड व विविध पुस्तकाचं वाचन याचा खूप उपयोग झाला. केंद्राकडून आलेल्या शिक्षिकेकडून खूप काही शिकायला मिळालं. अनुभव छान होता. महिला मंडळाच्या शारदोत्सवाचं कार्यवाहपद पण स्वीकारलं. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी, स्पर्धांचे आयोजन, आर्थिक नियोजन, वेळेचं व्यवस्थापन व सर्व सदस्यांचा सक्रिय सहभाग यामुळे शारदोत्सव छान झाला.

हे सगळं करताना आपण सतत कार्यरत नसल्याची खंत असते. आपण वाजवीपेक्षा जास्त रिलॅक्स होतोय असं वाटतं. अर्निंग करीत नसल्याची पण जाणीव होते. पण मग मनात येतं. आपण तर २८ वर्ष नोकरी केलीय. पण ज्या स्त्रियांनी फक्त गृहिणीपद सांभाळलंय, केप्रेबल असूनही ज्या करिअर नाही करू शकल्या, त्यांना काय वाटत असेल ? गृहिणीपद सांभाळणं

अतिशय जिकिरीचं काम आहे. त्यात चेंज ऑफ वर्क नाही. नोकरीपेशात असणाऱ्या स्त्रियांना चेंज ऑफ ॲटमॉसफिअरमुळे मनाची प्रसन्नता राखण्यास मदत होते. अर्थात दोन्ही आघाड्या सांभाळताना शक्तीचा ऱ्हास होतो. प्रसिद्ध स्त्रीरोग व वनौषधी तज्ज्ञ डॉ.ऊर्जिता जैन म्हणतात, ''स्त्रीची जवळपास ६० टक्के ऊर्जा घरातच खर्च होते. बाहेरच्या कामाला ती फक्त २० ते ४० टक्केच उर्जा देऊ शकते. म्हणून तिची खूप ओढाताण होते.'' निवृत्तीमुळे संवेदनशीलता वाढते. विचारचक्र जोरात फिरते म्हणून असं वाटतंय की स्त्रीसाठी अर्धवेळ नोकरी/व्यवसायाचा पर्याय हवा. म्हणजे ती घर व नोकरीला न्याय देऊ शकेल. आधुनिक काळात तर अर्धवेळ नोकरीचा पर्याय फारच आवश्यक आहे. बेकारीची गंभीर समस्या पण काही अंशी कमी होईल. अर्थात ह्या सगळ्याचा स्वतंत्र उहापोह होणे गरजेचे आहे.

पगाराच्या कितीतरी कमी अशी पेन्शनची रक्कम बघितली की मनात विचार येतो, आजकाल एक किंवा दोनच अपत्य असतात. पन्नाशीपर्यंत मिळविलेली राशी संगोपनासाठी व उर्वरित आयुष्यासाठी पुरेशी असते. मग नंतरही कमवत राहण्यात काय अर्थ. तीच जागा एखाद्या युवक/युवतीला मिळाली तरी किती छान. आर्थिक मंदीच्या काळात स्टेट बँकेने तेवीस हजार कर्मचाऱ्यांची भरती करून गिनिज बुकात जाण्याची तयारी केली आहे, त्यात आपलाही सहभाग असल्यास निश्चितच अभिमानास्पद आहे.

सेवानिवृत्तीचा असा सकारात्मक विचार निश्चितच आनंद देईल. पैशाची आवक बंद करणं हेदेखील एक सामाजिक कार्य आहे. जसे कृत्रिम हास्यसुद्धा लाभदायी असतं, तसं काही कारणानं घेतलेल्या निवृत्तीची ही सकारात्मक बाजू निश्चितच इतरांनाही प्रेरणादायी ठरेल.

आम्हा दोघांनाही आणखी खूप काही करायचंय. संगीत व नृत्य शिकायचंय, दोघंही बी.एड. असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिकवायचंय. काही गरजू विद्यार्थ्यांना विनामूल्य शिकवायचंय. मुलांची संतती म्हणजे नातवांना घडवायचंय. त्याबरोबर एखादं संस्कार शिबिर नियमित घ्यायचंय. दूरदर्शनसारख्या प्रभावी माध्यमातून आपले विचार प्रगट करायचेत. खूप मोठी यादी आहे ना. पण इतक्या प्रकल्पांचा विचार केला तर दोन, तीन अंमलात येतील. शब्द नको, कृती हवी हे जरी खरं असलं तरी असंही म्हणतात की, उचित विचारांची सवय लागली तर चांगली कृती आपोआप घडते. 'संवाद' ने हा विषय देऊन वैचारिक प्रगल्भतेची सवय लावली. अशीच लिखाणाची सवय लागली तर एखादी साहित्य कृतीही निर्माण होईल. व.पु.काळे म्हणतात, ''नियती रोज आपल्याला एक नवा कोरा दिवस देत असते.'' खरंच काय करतो आपण त्या दिवसाचं ? येणारा काळच ठरवेल. ''वक्त किस तरह दबे पाव चला गया । पता ही नही चला'' असं व्हायला नको. लिखाण उपदेशात्मक वाटू नये म्हणून लेख लिहिताना वैयक्तिक पार्श्वभूमी घेतली आहे. म्हणूनच म्हणावंसं वाटतं, भले कुणी म्हणो, मी घेतलीय निवृत्ती, पण मी म्हणते,

'आता तर खरी सुरू होत आहे
माझ्या जीवनाची दुसरी सुधारित आवृत्ती ।'

**- सौ.सुचेता हातेकर**, खामगाव
भ्रमणध्वनी - ९०११०६२४५२

## कास्तकार

ला वनं बापू सत्त्यावर सत्त्या
आता काहून करते आत्महत्या
आत्महत्या करून फुकट जीव देते
तुझ्या मरणाचं मोल सरकारच ठरवते
तुझ्या मरणाची वाटच पाह्यते
लाखाचा चेक तुरंत आणून देते
तुझ्या मरणाची जबाबदारी घेते का कोणी
सरकार तं करते आपलीच मनमानी
मरणाचा भाव एक लाख
कापसाचा भाव मातर ईचारू नगं
भाव द्याचा नसंन तं करते नाना सोंगं
कास्तकार मेला तं काय होणार आहे
निवडणूकीत तं विजय आमचाच हाये
ईतले वर्स केली तूनं होती
कां कमावलं खाल्ली नुसती माती
आतां तुले मरणाऱ्याचा मार्ग गावला हाय
लाखाच्या नोटा कधी पाह्यला हाय
वऱ्हाडचा शेतकरी म्हणे आत्महत्या करते
सरकार अन् विचारवंत ईचारच करते
पण जवा होतं पाणी आमच्या नद्यात
राजकारणी दंग होते चापलुसी करण्यात
चाटत होते पाय मुंबई-दिल्लीवाल्यायचे
पाणी सरल्यावर डोये उघडले आमचे
पैसा वाटून राजेहो, होत नसते शेती
पैसा पेरून का झाडं उगवती
ज्याचं दुःख राजा तोच जाणे
दुसरा जाणत नाही
कास्तकारच थांबवू शकते
हे सर्व काही, हे सर्व काही.

- सादरकर्ते - मोहन मोहदरकर
**- लक्ष्मीकान्त देशमुख,** अमरावती

# संवाद लेख स्पर्धा २००९

(पुरुष विभाग - प्रथम पारितोषिक विजेता लेख)

## ''सेवानिवृत्ती झाली - पुढे काय ?''

''आयुष्याची पाने उलटली
सेवानिवृत्तीदेखील झाली
संसाराची कर्तव्ये संपली
वृत्तीदेखील निमाली
अन् 'निवृत्तीची' सुरवात झाली !''

प्रत्येक व्यक्तीची ओळख समाजात दोन गोष्टींमुळे होते. जन्मानंतरचे चिकटलेले नावाचे लेबल अन् नोकरी-व्यवसायाचे लेबल. दोन्ही गोष्टींची सुरवात एका ध्येयाने होते. पाट्या टाकण्यासाठी कोणीच जन्म घेत नाही की नोकरी व्यवसाय करीत नाही.

जन्मत: 'स्व'चा शोध घेण्याचे अन् त्या परमेश्वरात विलीन होण्याचे ध्येय असते. नोकरी, व्यवसाय सुखाने चरितार्थ चालविण्याचे ध्येय. ध्येयाचा प्रवास सतत सुरू असतो. ध्येय म्हटले की मर्यादा आली. 'स्व'चा शोध घेण्यासाठी आयुष्य ही मर्यादा अन् नोकरीसाठी सर्वसाधारणपणे वय वर्षे साठीची. तीस वर्षांपेक्षा अधिक काळ नोकरीत एका ध्येयाने धावल्यानंतर जो एक मुक्कामाचा पडाव येतो तो 'सेवानिवृत्तीचा' ! काही क्षणांची उसंत, पुढच्या प्रवासाची तयारी, एक सिंहावलोकन करण्याचा टप्पा.

आयुष्याची अन् उमेदीची तीस वर्षांपेक्षा अधिक व्यस्ततेत घालविलेला काळ ! नोकरी अन् संसारात झालेली तारेवरची कसरत. एका वर्तुळासारखा झालेला हा प्रवास कधी परिघावरून तर कधी केंद्रबिंदू. ही धडपड म्हणजेच जिवंतपणाचे लक्षण मानायचे, कर्ताकरविता असल्याचा भास निर्माण करायचा. जबाबदारी, कर्तव्य ह्याची सांगड घालता घालता लक्षात येते की लग्नानंतर सुरवातीला दोघे होते तेच आतादेखील आहेत. मुलांचे शिक्षण पूर्ण होऊन नोकरीला लागली आहेत. पंखात बळ घेऊन गगनभरारी घेत आहेत अन् साथीदाराबरोबर घरट्यात रमली आहेत. प्रगतीचा आलेख खूप उंचावलेला असतो. कर्ता करविता कोणी वेगळाच आहे हे जाणवत असते, पण त्याचा प्रयत्नपूर्वक विसर पडलेला असतो. तीस वर्षांपेक्षा जास्त उमेदीचा काळ ज्या ठिकाणी घालविलेला असतो त्याच ठिकाणी नारळ अन् शाल ह्याचा स्वीकार करावा लागतो. त्याच क्षणी भान ठेवून संसारातून मानाचे श्रीफळ अन् मायेची ऊबदार शाल मनापासून आनंदाने स्वीकारायची असते. खऱ्या अर्थाने 'सेवानिवृत्त' होऊन निवृत्ती स्वीकारायची असते.

सेवानिवृत्तीने वयाची जाणीव करून दिलेली असते. शरीर कुरकुरायला लागते. बुद्धी अन् मनाचे विचार 'काय कमावले अन् काय गमावले' ह्याचा ताळेबंद' मांडत असते. काय काय करायचे राहिले ह्याचा विचार सुरू होतो. सप्त सुरांचे संगीत मनाला भुरळ पाडते. पु.ल., गदिमा, कुसुमाग्रज...... सारे जवळचे वाटायला लागतात. आमटे कुटुंबियांचे उत्तुंग ध्येय अन् त्यागाने भारावून गेल्यासारखे होते. आगगाडीचे रूळ मृगजळाच्या मागे धावायला लागतात. विपुल संत-साहित्यात कुठून प्रवेश करायचा ह्याचा अंदाजच येत नाही. सत्संग अन् आस्था ह्यासारखे कार्यक्रम गोंधळात भर घालतात. प्राणायाम अन् योगाचे वर्ग शरीर-स्वास्थासाठी बोलावत असतात. थोडक्यात काय तर सेवानिवृत्ती-नंतर काय हा प्रश्न तसाच राहतो. त्याचेच उत्तर शोधण्याचा हा एक प्रयत्न !

सेवानिवृत्तीनंतर खरंतर आयुष्यातला एक नवीन टप्पा, नवीन मार्ग, 'स्व'चा शोध घेण्याचा श्रीगणेशा ! सुरवात अशी की जी सहज असावी, आनंद देणारी अन् आनंद घेणारी असावी. 'हृदया'तून अन् हृदयाच्या प्रत्येक 'स्पंदना'तून असावी. जगण्याची ऊर्मी असावी, जगण्याची स्फूर्ती असावी. खरंतर ही एक नवीन ओळख असते. स्वत:ची स्वत:शी झालेली ! तीस-चाळीस वर्षांच्या वृत्तीतून म्हणजे राग, लोभ, द्वेष, मत्सर, अहंकार, सुख-दु:ख ह्यातून बाहेर पडण्याची वेळ. 'सेवानिवृत्ती' स्वीकारायची, वृत्ती सोडायची पण निवृत्त व्हायचे नाही. आयुष्याच्या दैवी देणगीतून निवृत्त व्हायचे नाही. ज्या ज्या वेळेला जे जे होईल ते ते स्वीकारत जायचे. अगदी सहजतेने अन् आनंदाने.

ह्याची सुरुवात दोन फुलस्केप पेपरांपासून करायची. एका पेपरवर क्लेशदायक घटना, दु:खद क्षण-अगदी थेट लहानपणापासून. आईवडिलांचे धपाटे, मास्तरांची पट्टी, प्रतिसादाला साद न देणारी कॉलेजकन्या, नोकरीतील तार-स्वरातील मैफील. आठवणीतील अशा अनेक गोष्टी ह्या कागदावर उतरून काढायच्या.

दुसऱ्या पेपरवर आनंददायी घटनांची साखळी जोडायची. उंच उडवलेला पतंग, सायकल चालविता येण्याचा क्षण - ज्या ज्या छोट्या छोट्या गोष्टींतून आनंद दिला, बघितला, घेतला, सारे क्षण टिपायचे. एक क्षणाचे वजन काकणभर जास्त होते. मन आनंदाने भरून जाते. दिसतो, जाणवतो तो फक्त आनंदच आनंद.

दु:ख देणाऱ्या गोष्टींची परत परत उजळणी करायची, अन् तो कागद चक्क फाडून फेकून द्यायचा. त्या दु:खद आठवणी मनाच्या मुळापासून उपटून टाकायच्या. स्मृतीतून हद्दपार करायच्या पण त्यांची आठवण न काढण्यासाठीच. मग राहतात त्या फक्त दुसऱ्या कागदावरील आनंददायी घटना ! चुकून काही दु:खद प्रसंग-घटना घडल्या तरी आनंददायी घटनांची उजळणी करायची. मग जी प्रक्रिया सुरू होते ती मनाच्या शुद्धिकरणाची!

मग मनाची झेप फक्त आनंददायी क्षणापर्यंतच जाते. आनंददायी क्षण हृदयाकडे प्रवाहित होतात अन् मन आपोआप हृदयात विरून जाते. बुद्धी हा सारा खेळ चौकसपणे बघत असते.

बघता बघता साऱ्या कसोट्या पार करीत नकळत बुद्धीदेखील त्यात प्रवाही होते. मेंदूची तल्लखता अधिकच वाढते. आनंदाच्या ह्या लहरी शरीरभर प्रवाहित होतात. नित्य नवीन श्वासासारखी अन् हृदयाच्या स्पंदनाप्रमाणे आनंद देणारी जिवंतपणाची जाणीव करून देणारी अन् म्हणूनच हृदयाच्या स्पंदनातून जगण्याची एक लय गवसते !

हृदयाचे 'स्पंदन' हीच खरी ओळख. देहाला शुद्ध रक्ताचा पुरवठा करणे अन् जिवंतपणाचे लक्षण जपणे हे कर्तव्य हृदय सतत सहजपणे अन् आनंदाने करीत असते. खरंतर अगदी सूक्ष्म स्वरूपात प्राणवायु लागतो, पण तो सतत लागतो. स्पंदनातून रक्त शुद्ध करण्यासाठी अन् ह्यातून शरीरभर प्राणाचा, चैतन्याचा, तेजाचा, अगदी परमेश्वराचादेखील संचार होण्यापुरता ! प्राण, चैतन्य, तेज.... ज्याला जसे भावले तसे नाव दिले जाते. ह्या क्रियेतून हृदय साऱ्या देहाला आनंद देते अन् त्याच आनंदात आनंदून जाते. खरंतर ह्या क्रियेला देहातील, मेंदूतील कुठलीही शक्ती उपयोगी पडत नाही. आनंद देणारा अन् घेणारा स्पंदनातून जाणवणारा श्वासच ! मन, बुद्धी डोळ्यांना दिसत नाही किंवा कुठल्याही अवयवाप्रमाणे दाखविता येत नाही. पण हृदय दाखविता येते. हृदयाचे स्पंदन जाणवते. अगदी आनंदाच्या कारंज्याप्रमाणे नाचणारे बागडणारे. स्पंदानातून श्वास पुरविण्याचे, देहात अन् देहाबाहेरील विश्वाला श्वास पुरविण्याचे आभार मानीत त्या विश्वनिर्मात्या परमेश्वराचा जप हृदय सतत करीत असते. इथचं 'स्व'चा शोध करीत आनंदाने 'स्व'मध्ये विलीन होण्याची प्रक्रिया सुरु होत, स्पंदनातून परमेश्वरात विलीन होण्याचा मार्ग गवसतो !

ह्या आनंदाचा शोध घेत मार्गस्थ होणे हेच खरे निवृत्तीनंतरचे कार्य बाकी राहते. श्वासाचा प्रवाह, स्पंदनाचे संगीत ऐकत बुद्धीला अन् मनाला त्या प्रवाहात विसर्जन करणे हाच काय तो प्रवास चालू राहतो. स्पंदनाचा आवाज तोच खरा 'स्व'चा 'स्व'शी झालेला संवाद ! ज्याला भावेल तसा तो आतला आवाज. अगदी अनंत स्वरूपात अन् अनंत नामात ! आपापल्या परीने ह्या आनंदाचा शोध घेणे हाच निवृत्तीनंतरचा मार्ग ! एकदा का हा आनंदाचा ठेवा सापडला की निवृत्तीचा अर्थ उमगायला लागतो. मग बाकी व्यावहारिक, पारमार्थिक गोष्टी अगदी आपोआप सहजपणे घडायला लागतात. अगदी स्पंदनातून विश्वनिर्मात्यात विलीन होत निवृत्त होतो-

'हृदयातून जीवनाचा आनंद देणे
हृदयापासून जीवनाचा आनंद घेणे
स्वत:चा स्वत:शी 'संवाद' साधणे
हेच खरे 'निवृत्ती' नंतरचे जगणे !!!'

- **यशवंत हरी डबीर,** पुणे
दूरध्वनी : ०२०-२५४२२३०३

# मुंबई कुणाची ?

साठच्या दशकात मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोशात असताना महाराष्ट्रात वक्तृत्वाच्या ज्या मुलुख मैदानी तोफा होत्या त्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांचा फार वरचा क्रमांक होता. आपला मुद्दा पटवून देण्यासाठी ते असा काही एखादा किस्सा सांगत की तो त्या प्रसंगाला अगदी चपखल बसे. बोलता बोलता गोष्ट सांगून झाल्यानंतर श्रोत्यांनाच ते प्रश्न विचारून त्यांचेकडूनच उत्तर घेत. त्यावेळी ''मुंबई कोणाची- गुजराती लोकांची की मराठी लोकांची ?'' हा कळीचा मुद्दा होता. मराठी लोक म्हणत की, मुंबई मूळची आमची आहे. त्यामुळे तीवर आमचा हक्क आहे. याउलट गुजराती लोक म्हणत की मुंबई मूळची तुमची असेल तथापि व्यापार, उद्योग वाढवून आम्ही तिला मोठी केली आहे. त्यामुळे मुंबईवर आमचा हक्क पोहोचतो. शेवटी मग मुंबई कोणाला द्यायची ? या मुद्यांवर बोलताना मुंबईमध्ये क्रांतिसिंहांनी लोकांना खालील किस्सा ऐकवला -

''एकदा एका गावात एक चार-पाच वर्षाचे पोर मुडदूस होऊन आजारी पडले. मोठमोठ्या वैद्यांनी, डॉक्टरांनी त्याच्यावर उपचार केले. पण उपयोग शून्य. दिवसेंदिवस त्या पोराच्या हातापायाच्या काड्या झाल्या. मात्र पोट फक्त फुगू लागले. डॉक्टरी उपाय करून थकल्यानंतर त्याच्या आईबापाला कुणीतरी डोंगरे बालामृतवाल्याचा सल्ला घ्यायला सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी डोंगरे बालामृतवाल्याला गाठले व पोराची तब्येत दाखवली. डोंगरेंनी तब्येत तपासून त्याला आपल्याकडे ठेवून घेतले व औषध उपचार चालू केले आणि काय आश्चर्य ! पंधरा-वीस दिवस औषध दिल्यानंतर त्या मुलाच्या तब्येतीत लक्षणीय सुधारणा दिसू लागली आणि महिना दीड महिन्यानंतर ते ठणठणीत बरे झाले.

आईवडिलांना मुलगा ठणठणीत झाल्याचे पाहून खूप आनंद झाला आणि एक दिवस ते मुलाला आपल्या घरी परत नेणेसाठी डोंगरे बालामृतवाल्यांकडे गेले. परंतु डोंगरे बालामृतवाल्याने ते मूल आईवडिलांना देण्यास साफ नकार दिला. तो म्हणाला, ''मुलाला तुम्ही जन्म दिला असेल, त्याला लहानाचा मोठा केला असेल. तथापि मृत्युपंथाला लागलेल्या तुमच्या मुलाला आम्ही बालामृत पाजून बरे केले. त्यामुळे त्याच्यावर आमचाच हक्क आहे आम्ही ते मूल तुम्हाला देणार नाही.''

ही गोष्ट सांगून झाल्यावर सभेला लाखोंच्या संख्येनी जमलेल्या लोकांना क्रांतिसिंहानी प्रश्न केला. ''बोला, पोर कुणाला द्यायचे ? जन्म देऊन वाढविलेल्या आईबापाला की मरणोन्मुख मुलाला बालामृत देऊन वाचविलेल्या डोंगरे बालामृतवाल्याला ?''

श्रोत्यांतून उत्तर आले, 'जन्मदात्या आईबापाला.' पुढचा प्रश्न 'मग मुंबई कोणाची ? जन्म दिलेल्या महाराष्ट्राची की वाढविलेल्या गुजरातची ?' श्रोत्यातून अर्थातच उत्तर, 'मुंबई महाराष्ट्राची.'

- **गजानन जोशी,** कोल्हापूर
भ्रमणध्वनी - ९८८१२५९८९५

# पहिले विश्व मराठी साहित्य संमेलन
## चक्षुर्वैसत्यम् वृत्तांत

भारताबाहेरील पहिलेच 'विश्व मराठी साहित्य संमेलन' अमेरिकेतील पश्चिम किनारपट्टीवर वसलेल्या सॅनफ्रान्सिस्को बे एरियात दि. १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान संपन्न झाले. बे एरियातील दक्षिणेचा भाग सिलीकॉन व्हॅली म्हणून ओळखला जातो. गुगल, ॲपल एच पी सारख्या अनेक जागतिक कंपन्यांचे हे बे एरीयातील सगळ्यात मोठे शहर मराठी संस्कृतीचे माहेरघर समजले जाते. तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे.

संमेलनात एवढ्या मोठ्या संख्येत मराठी लोकांना पाहून प्रत्येक मराठी मन फुलपाखरासारखे आनंदनिर्भर झाले होते. हा क्षण मराठी भाषिकांसाठी अभिमानाची बाब ठरला. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष अरूण प्रभुणे यांनी अमेरिकेत असताना बे एरियातील महाराष्ट्र मंडळाचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने अध्यक्ष संदीप देवकुळे यांचे फोनवर अभिनंदन केले व मराठी साहित्य संमेलन इथे घ्यायला आवडेल का म्हणून चाचपणी केली. संदीप दोन दिवसात सांगतो म्हणाले, त्यांचा प्रतिसाद २ तासातच आला. सर्व सहकाऱ्यांनी त्यांना उत्स्फूर्त संमती दिली.

कुठलीही नवीन गोष्ट करावयाची म्हणजे विरोधकांचा उत्पात अपेक्षितच. उलट सुलट चर्चा झाल्या. परंतु महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ढाले पाटील व इतरांचा भक्कम पाठिंबा यामुळे हा सोनियाचा दिवस उगवला. भारतातून सहभागी झालेल्यांमध्ये कुणी शेतकरी, कुणी शिक्षक, प्राध्यापक, कुणी साहित्यिक तर कुणी नोकरदार तसेच माझ्यासारखा पेन्शन वाढीची वाट पाहणारा पेन्शनर अशा सर्व थरातील लोकांचा समावेश होता. मराठीचा प्रचार प्रसार हे संमेलनाचे उद्दिष्ट.

मंडळाने प्रवासाची संपूर्ण व्यवस्था मुंबईच्या 'राजाराणी ट्रॅव्हल्स'वर सोपवली होती. मुंबईहून १२ फेब्रुवारीला पहाटे निघून २२ तासांनी सॅनफ्रॅन्सिस्कोत येऊन पोहोचलो. बे एरियातील कार्यकर्त्यांनी आम्हा सर्वांचे कुंकुमतिलक लावून, पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. पहिल्या दिवशी थंडीपावसात सकाळी ९ वाजता ग्रंथ दिंडीने भरगच्च कार्यक्रमाला सुरूवात होऊन रात्री १२ नंतर पद्मश्री पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या संगीताच्या कार्यक्रमाने सांगता झाली. दुसऱ्या तिसऱ्या दिवशीही १४-१४ तासांच्या कार्यक्रमात कवी-संमेलन, संत-साहित्य आणि आधुनिकीकरण, अविनाश धर्माधिकारी यांचे भाषण, सुधीर गाडगीळांनी प्रशांत दामले यांची घेतलेली मुलाखत, सारेगम कार्यक्रम, विविध परिसंवाद पार पडले. स्थानिक कलाकारांनी सादर केलेल्या कार्यक्रमात ६ ते १२ वर्षे वयापर्यंतच्या ६६ मुलांचा सहभाग होता. अमेरिकेत मराठी ही दुसरी भाषा आहे. अश्विनी भावे, सुधीर गाडगीळ निवेदक होते. संदीप देवकुळे स्वागताध्यक्ष होते. संमेलनाचे अध्यक्षपद डॉ.गंगाधर पानतावणे यांनी भूषविले.

भारतातून आलेल्या निमंत्रितात द.मा.मिरासदार, डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, श्री.शंकर वैद्य, दादा गोरे, अरूणा ढेरे, प्रदीप दवणे, अजीत दळवी, प्रकाश बाळ, आयएएस अधिकारी अविनाश धर्माधिकारी, डॉ.उदय निरगूडकर, आघाडीचे पत्रकार चंद्रशेखर कुलकर्णी व शासनातर्फे सांस्कृतिक मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील इ.दिग्गज मंडळींनी संमेलनाची शान वाढविली होती.

संमेलनात बाजी मारून गेल्या त्या सिंधुताई सपकाळ, हजार मुलांच्या 'माई' प्रभावी. रसिक प्रेक्षकांनी अनेकदा त्यांच्या भाषणास उभे राहून (Standing ovation) अभिवादन केले. अनाथ मुलांसाठी संमेलनात आर्थिक मदत गोळा करण्यात आली. सिंधुताई कोरफडीच्या पानावर काथ्याने कोरून अ आ इ ई शिकल्या. ९ व्या वर्षी ३० वर्षे वयाच्या हरी सपकाळांशी त्यांचे लग्न लावण्यात आले. गरोदर असताना नवऱ्याने मारहाण करून मेली म्हणून गाईच्या गोठ्यात फेकून दिले. तिथे ममता नावाच्या मुलीस जन्म दिला. हीच मुलगी पुढे सामाजिक विज्ञान विषयात उच्च पदवी प्राप्त करून हडपसरला 'सन्मती बाल निकेतन' चालवते. सिंधुताईंना आत्तापर्यंत ५० हून अधिक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यात सावित्रीबाई फुले पुरस्काराचा समावेश आहे. भरत जाधव, अंकुश चौधरी यांच्या कार्यक्रमानेही संमेलनाला मजा आणली. संमेलनाची स्मरणिका केवळ देखणी नसून वाचनीय आहे. श्री.ठाणेदार अध्यक्ष यू एस्.ए. यांनी येणाऱ्या भविष्यकाळात मराठी साहित्याचा नोबेल पुरस्काने सन्मान होईल अशी आकांक्षा व्यक्त केली.

भारतात हरवलेला महाराष्ट्र आम्हाला अमेरिकेत सापडला. 'एस.बी.आय. पेन्शनर्स क्लब'चा ऋणनिर्देश केल्याशिवाय हा लेख पूर्ण होऊ शकत नाही. या क्लबचा मी सेक्रेटरी आहे. २००८ दिवाळी अंक 'स्नेहदीप' च्या प्रकाशनाची आमची मिटिंग श्री. कुडीयाडी यांच्या घरी होती. मिटिंगला मी पुतण्या अमितने पाठवलेला अमेरिकेतील टी शर्ट घालून गेलो होतो. माझे सहकारी व मासिकाचे संपादक श्री.अनिल बिडये यांनी विचारले, ''काय कुलकर्णी, अमेरिकेला साहित्य संमेलनाला निघालात का ?'' ही घटना मी घरी सांगितली. मुलगा प्रसाद व सून सौ.प्राची यांनी खरोखर 'जा. खर्चाची काळजी करू नका' म्हणून सांगितले. दोनदा अमेरिकन व्हिसा नाकारला गेल्यामुळे २० हजार रू. वाया गेले होते. यावेळी इंटरव्ह्यूची भाषा मराठी घेतली. ३५० इच्छूकांपैकी आम्ही उभयता सर्व प्रथम ४ डिसेंबरला इंटरव्ह्यूला गेलो. अमेरिकन साहेबांनी विचारले, तुमचा साहित्य संमेलनाशी संबंध काय ? आम्ही आमच्या क्लबचा अंक त्यांना दिला व आम्ही दोघं लेखक आहोत म्हणून सांगितले. त्यामुळे पुढील प्रश्नोत्तरे समाधानकारक होऊन आम्हास व्हिसा मिळाला. अमेरिकन कॉन्सूलेटने ३५० इच्छुकांपैकी १२५ लोकांचा व्हिसा नाकारला म्हणून आमच्या पेन्शनर्स क्लबचा ऋणनिर्देश करणे अगत्याचे.

- **अंबादास का.कुलकर्णी,** अंधेरी (पूर्व), मुंबई
भ्रमणध्वनी - ९३२४६८५४३४.

## आठवणी : एक विरंगुळा !

परवाच मी, दीपक व गजाभाऊ बसलो होतो. तेव्हा मी दीपकला विचारले, 'आठवणी म्हणजे काय ?'

तो पटकन म्हणाला, 'ज्या सारख्या सारख्या आठवतात त्यांना म्हणायचे आठवणी !'

गजाभाऊ मात्र म्हणाले, 'चाऊसच्या डिक्शनरीत आठवण म्हणजे रिकलेक्शन मेमरी !'

अर्थ काहीही असो आठवणी मात्र मानवाचे जीवन व्यापून टाकतात. त्यावर मग मला सुचले -

*'आठवणींचा ओघ न संपणारा असतो.*
*तो पुन्हा पुन्हा आपल्याला भूतकाळात नेत असतो.*
*कधी मग हसवतो तर कधी रडवतो.*
*पण तरीही तो कसा हवाहवासा वाटतो.'*

मला मात्र काही लिहावेसे वाटते त्याला कारण आहे आठवणी. प्रत्येकावर चार ओळी आठवणीदाखल मी लिहितोच. सर्वात प्रथम मी चार ओळी लिहिल्या त्या आईच्या जाण्यानंतर...

*'राखेत हात घालताना, डोळ्यात अश्रु आले ।*
*कालच्या जिवंत देहाचे, पहा आज काय झाले ।'*

नंतर आठवला कॅन्सरने गेलेला तरुण पुतण्या...

*'खूप सोसल्या त्याने वेदना,*
*पहिले हसतमुखाने सोसल्या ।*
*नंतर मात्र त्या वाढतच गेल्या,*
*अन् शेवटी तर सोसण्यापलीकडे गेल्या ।'*

खरंच असे दु:ख कोणाला देऊ नये देवाने. पण आपल्या हातात काहीच नसते. आमची काळजी घेणारे माझे जावई अचानक कार अपघातात गेले अन् तेव्हापासून दु:ख कसे ते कमी झालेच नाही.

*'घडणारी घटना कशी अकस्मात घडून गेली .*
*जाताना सर्वांच्या जीवाला चटका लावूनच गेली .*
*दृष्टीसमोर येते मग तुझी अखेरची लढाई .*
अन् आपण काही करू शकलो नाही ही खंत देऊन गेली.

एकंदरीत मृत्यूची कल्पना जीवाला खूप क्लेशदायक असते. मग सुचले -

*'दचकतो मनुष्य कसा मृत्यूच्याच कल्पनेने,*
*कारण जगायचे असते त्याला ताठ मानेने ,*
*म्हणूनच आज्ञा केली ईश्वराने यमाला ,*
*हळूच टाकत जा हा फास मृत्यूचा ,*
*जाणवू न देता कधी कोणाला .'*

पुढे मेळघाटात कुपोषणाने मृत्यू होत होते तिथे गेलो तर काय दिसले ?

*'चर्चा कुपोषणाची करण्याकरिता,*
*जमली होती थोर धेंडं ,*
*मेजवानीकरिता त्यांच्या,*
*सोलला होता एक अख्खा बोकड '.*

बरे मदतीचे काय दिसले ?

*'मदत येत होती तिथे लाखांत ।*
*पण पोहोचत होती ती त्यांना शेकड्यात ।'*

पाणीटंचाईने उग्र स्वरूप धरले होते. त्यावर मग सुचले -

*'पाणी पाणी म्हणता म्हणता*
*डोळ्यांतही पाणी आले ।*
*नळाला पाणी कसे येतच नव्हते*
*विहिरीत होते तेहि आटले ।'*

मग सरकारने कृत्रिम पावसाचा प्रयोग केला-

*'नैसर्गिक अन् कृत्रिम पाऊस*
*ह्यांच्यातला फरक कसा*
*मानवाला आता कळून आला*
*कृत्रिम पावसाचा छटाकभर पाऊस*
*सर्वत्र कसा पळून गेला'*

मॅट्रिकच्या किंवा कोणत्याही महत्त्वाच्या परीक्षेत आई मुलाची खूप चिंता करते.

*'दहावीच्या परीक्षेला जाताना*
*माझी खूप घाई उडाली होती ।*
*माझ्यापेक्षा जास्तच तेव्हा*
*आई माझी चिंतित होती ।'*

पत्नीच्या गलेलठ्ठ मैत्रिणीची आठवण झाली अन् सुचले -

*'गलेलठ्ठ मैत्रीण हिची*
*साध्या साध्या जोक्सवर देखील*
*सारखी खदखदून हसायची,*
*हसताना सर्वांगाने हलायची.*
*शेजारचे लोक मग सरकायचे*
*नको उगीच अंगावर पडली तर*
*हात-पाय मोडायचे म्हणून*
*तिला त्याची कल्पना नसायची*
*ती हसतच असायची*
*अन् मग आम्हाला तेव्हा*
*कशाही गर्दीत हमखास जागा मिळायची'*

मग बायकोमुळे हवालदिल झालेला मित्र आठवला -

*'लोणचे घातले आहे माझे*
*अजून फिटली नाही का तुझी हौस*
*आता काय विचार आहे तुझा*
*खिमा करायचा आहे का माझा ?'*

महिला मंडळात 'दासबोध-वाचन' सुरू होते तेव्हा मग सुचले -

*'आजकाल ही वाचते सतत दासबोध*
*नवऱ्याच्या अवगुणांचा घेत असते सतत शोध ।*
*सकाळपासून हिची कलकल, भुणभुण सुरू असते*
*कशी शांतता घरात, असतो सतत प्रतिशोध ।*
*वाचन दासबोधाचे महिला मंडळात सुरू असते*
*प्रवचन हिचे दासबोधावर नित्य सुरू असते ।*

*नेहमीच तडजोडीचे महत्त्व ती सांगत असते*
*घरात मात्र नो ॲडजस्टमेंट हे तिचे ब्रीद असते ।*
*दासबोधावरच्या प्रवचनामुळे ती प्रसिद्धीस येते*
*म्हणून दासबोध पुन्हा पुन्हा ती पठन करीत असते ।*
*सगळे दासबोधच आता तिला पाठ होते*
*रामदासानंतर प्रतिरामदासी ती स्वत:ला समजत असते ।*
*नवऱ्याला घरात सुखशांती हवी असते*
*नुसत्या वाचनाने का ती मिळणार असते ?*
*तो हा प्रश्न स्वत:लाच नेहमी विचारत असतो*
*तिच्या 'माझेच खरे' ह्या इगोत उत्तर लपले असते ।'*

व्ही.आर.एस्.ची आठवण झाली अन् सुचले -

*'वाट पूर्वी तू माझी पहात असायची*
*आता मात्र वेळ आली आहे मी तुझी वाट पहायची ।*
*असेच चित्र आता दिसते सर्वत्र*
*गोड व्ही.आर.एस. नंतर पाळी आली आहे*
*घर सांभाळायची ।'*

काही चिंतनिका मग आठवणीतून सुचल्या -

* *'स्मार्ट, टंच शेजारीण नेहमीच शेजारी राहते*
*नजर बायकोची चुकवून मग*
*न्याहाळणी प्रत्येकाची सुरूच असते.'*

* *'मुलांचा पॉकेटमनी कमी करण्याचे धाडस*
*नवऱ्यात कधीच नसते.*
*कारण बायकोने त्यांना मोठे बनवायचे (?)*
*लहानपणापासून ठरलेले असते.'*

* *'आजोबा शेजारचे दूरचे दिसत नाही*
*म्हणून ओरडत असतात*
*डोळ्यावर हात ठेऊन*
*खालच्या म्हताऱ्या आजींना खुणावत असतात.'*

* *'काही वादातीत नाती, अजूनही नाही बदलली -*
*सुनेने केलेली सासूची स्तुती,*
*नाही अजून कानावर आली ।*
*नावडत्या नवऱ्यांचे संसारात स्थान काहीच नसते*
*फक्त लग्नबंधन आहे म्हणून एकत्र राहणे असते ।*
*कां म्हणून मग मी वड पुजावा ?*
*नाहीतर उगीचच पुढील जन्मी*
*तो मिळण्याची भिती असते ।'*

असे आहे ह्या आठवणींचे. माझ्याप्रमाणे तुम्हाला पण येत असतील. तोच एक विरंगुळा असतो आपल्या सारख्या निवृत्त लोकांना. आयुष्याच्या संध्याकाळी त्यातच रमायचे आता.

**- रमेश त्रिं. इंगोलीकर,**
'स्मृती गंध', दंडे प्लॉटस्, राजा पेठ, अमरावती

# प्रतिक्रिया

चूक कोणाची ? हा प्रश्न प्रत्येकालाच कधी ना कधी तरी सतावतोच. 'मी चूक केली का ?' ह्याचे उत्तर आपणच नाही असे देतो. म्हणून पुढले प्रश्न निर्माण होतात. ' सिद्धू चुकला की हॉटेल मालक चुकला की आणखी कोण ?' ह्यांची उत्तरेही सापडत नाहीत व एक गाणे आठवते - पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा - दोष ना कुणाचा. सिद्धूला पेपर वाचताना हॉटेल मालक रोजच पहात होता. पेपरावर केलेला खर्च सार्थकी लागतोय हा त्याचा व्यवहारी दृष्टीकोन होता. गोखल्यांनीही सिद्धूसारखी गरिबीने पिडलेली अनेक मुले त्या आधीही पाहिली असतील पण त्याच्याच बाबतीत त्यांना दया वाटली. शिक्षणाने त्याचे भले होईल असा विचार त्यांच्या मनात आला असावा. लगेच त्यांनी तो बोलूनही दाखविला व कृतीत आणण्याची संधीही त्यांना मिळाली.

लहान वयाचा असूनही सिद्धू शहाणा होता. प्राप्त परिस्थितीत त्याने एक मार्ग निवडला होता. स्वत: कष्ट करायचे व बहिणीला शिकवायचे. गोखल्यांच्या शाळेत पाठवण्याच्या प्रस्तावनेने तो आपल्या ध्येयापासून विचलीत झाला. फुकट मिळतंय म्हणून भुलला-कारण त्याचे प्राक्तनच तसे होते-गावभर फिरण्याचे, हमाली करण्याचे. गोखले फक्त निमित्त झाले.

हॉटेल मालक टीकाकारच ठरला. त्याच्या बुद् ध्यांकाप्रमाणे त्याने पटकन गोखल्यांनाच दोषी ठरविले. इतर पोरे आपल्यामुळे चांगल्या मार्गाला लागली व सिद्धू - ह्या शिकल्या सवरलेल्या बी.एम. मुळे वाया गेला असा समज त्याने करून घेतला होता. खूप वेळा आपणही म्हणतोच-

कळेना अजुनी माझे मला - असा मी काय गुन्हा केला.

**- वर्षा शरद जोशी,** डोंबिवली (पू.)

******

गेले काही महिने 'संवाद' नियमितपणे वाचत आहे. बँकेच्या ऑफिशियल मजकुरासोबत अन्य लेख, प्रवासवर्णने, जीवनातील अनुभव, नोकरीच्या दरम्यान येणारे अनुभव, चुटके, कविता, सर्वच वाचनीय असते, भावते. सर्वजण सराईत लेखकासारखेच छान लिहितात. मनापासून लिहितात. 'संवाद' ची विविधता अशीच कायम राहो. वाढो ही शुभेच्छा !

'मार्च' च्या संवाद मधील श्री.चिंतामणी गोखले यांचा 'चूक कोणाची' हा लेख अप्रतिम वाटला. अंतर्मुख करणारा वाटला.

**- गोविंद साठे,** ठाणे

******

मार्च २००९ महिन्याचे संपादकीय वाचून समाधान वाटले. ईश्वराने आपणास मनुष्यजन्म दिला म्हणून खरे तर आपण ईश्वराचे आभार मानायला हवेत. आनंदी जीवन जगायचे तर प्रथम शरीर सांभाळा. आपला व्यवसाय सुरळीत चालावा असे वाटत असेल तर मन समाधानी असावे. आपले जीवन हा एक मोठा रंगमंच आहे आणि आपण या रंगमंचावर काम करणारे लहान-मोठे कलाकार आहोत.

**- मारुती कुंभार, धुळे**

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. L-2/RNP/PNW/M-144/2008-2010 Dated 28.05.2008
Licence to post without Prepayment No.: LWP-217 at Market Yard PSO, Pune 37on 25th of each Month

## दु:खात रात्र होती

जेव्हा समस्त जनता निद्रेत शांत होती
मुंबापुरीत तेव्हा दु:खात रात्र होती ।।ध्रु.।।
आतंकवादी होते शस्त्रासवे लपून
भीतीत श्वास होते प्राणातुनी भरून
डोळ्यात जीवघेणी बरसून आग होती
मुंबापुरीत तेव्हा दु:खात रात्र होती ।।१।।
निष्ठुर शस्त्रधारी आतंकवादी आले
अंधारल्या दिशांना लपुनी छपून बसले
जनता मनोमनी ती भयभीत मात्र होती
मुंबापुरीत तेव्हा दु:खात रात्र होती ।।२।।
झाले किती धमाके, झडल्या कितीक फैरी
आबाल-वृद्ध सारे झाले आतंक-वैरी
रक्तात माखुनी ती झाली विराण नाती
मुंबापुरीत तेव्हा दु:खात रात्र होती ।।३।।
हे काठ लोचनांचे अश्रूत चिंब न्हाती
अन् शब्द अंतरीचे दु:खात गीत गाती
निष्पाप त्या मृतांच्या जळती मनात ज्योती
मुंबापुरीत तेव्हा दु:खात रात्र होती ।।४।।

- **सुधाकर कुलकर्णी,** मडगाव (गोवा)
दूरध्वनी : ०८३२-२७१०३५२

## Value of Time

To realise the value of one-year,
Ask a student who has failed in his examination.
To realise the value of one-month,
Ask a mother who has given
birth to a premature baby.
To realise the value of one week,
Ask an editor of a weekly.
To realise the value of one-day,
Ask a daily-wage labourer.
To realise the value of one-hour,
Ask the lover who is waiting to meet.
To realise the value of one-minute,
Ask a person who has missed the train.
To realise the value of one-second,
Ask a person who has survived an accident.
To realise the value of one milli-second,
Ask a person who has won
Silver Medal in Olympics.

Collection by - **Madanlal Kabra,**
Jalgaon. Mobile - 9730550410

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा ‘संवाद’ चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही.
२) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी.
संपर्क दूरध्वनी क्र. (०२०) २४३३२१४१

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners’ Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners’ Association (Mumbai Circle),Pune, at “Anubandh”, Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.